। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १७९ वा । सोमवार, दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## राज्यातील नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची घोषणा

### १७ नगरपरिषदांमध्ये अनुसूचित जाती तर ३४ नगरपरिषदा ओबीसी महिलांसाठी राखीव

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची घोषणा करण्यात आली. एकूण २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींसाठी ही सोडत मंत्रालयात काढण्यात आली. या प्रक्रियेनंतर ३३ नगरपरिषदांपैकी १७ नगरपरिषदांमध्ये अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जानेवारी महिन्याअखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याचे निर्देश दिल्यानंतर प्रशासन तयारीला लागले आहे. त्यानुसार आज मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढण्यात आली. आपल्या शहराचे नगराध्यक्षपद कोणत्या प्रवर्गाकडे जाणार, याबाबत लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्सुकता होती.

**राज्यातील महिलांना मोठी संधी**

या आरक्षण प्रक्रियेत महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. विशेषतः अनुसूचित जातीच्या महिलांना १७ नगरपरिषदांमध्ये संधी देण्यात आल्याने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने सरकारकडून सकारात्मक पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. मोहोळ, ओझर, भुसावळ, शिर्डी, दिग्रस, अकलूज आणि बीडसारख्या प्रमुख नगरपरिषदांमध्ये महिलांना आरक्षण मिळाल्याने स्थानिक राजकारणात नवीन नेतृत्व उदयास येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**कोणत्या नगरपरिषदांना मिळाले आरक्षण**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार, खालील १७ नगरपरिषदांसाठी अनुसूचित जाती महिला प्रवर्ग आरक्षित करण्यात आले आहे.

देऊळगावराजा, मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, घुग्गूस, चिमूर, शिर्डी, सावदा, मैनदर्गी, दिगडोहदेवी, दिग्रस, अकलूज, बीड आणि शिरोळ या नगरपरिषदांमधील स्थानिक कार्यकर्त्यांनी तयारी सुरू केली असून, अनेक ठिकाणी महिलांमध्ये उमेदवारीसाठी हालचाली दिसून येत आहेत.

**३४ नगरपरिषदा ओबीसी महिलांसाठी राखीव**

६४ नगरपरिषदांपैकी ३४ नगरपरिषदांमधील नगराध्यक्षपद हे ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे.



ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झालेल्या नगरपरिषदांमध्ये इगतपुरी, भोकरदन, जुन्नर, दौंड, माजलगाव, कर्जत, रोहा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांचा समावेश आहे.

या व्यतिरिक्त, भगूर, विटा, बल्हारपूर, धाराशिव, उमरेड, कुळगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जंजीरा, शिरूर, काटोल, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर- नवाबपूर, औसा, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, कुरडुवादी, धामणगावरेल्वे आणि वरोरा या नगरपरिषदांचाही समावेश ओबीसी महिला आरक्षित यादीत आहे.

**ओबीसी महिलांसाठी राखीव नगरपरिषदा**

भगूर, इगतपुरी, विटा, बल्हारपूर, धाराशिव, भोकरदन, जुन्नर, उमरेड, दौंड, कुलगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जंजीरा, शिरूर, काटोल, माजलगाव, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर-नवाबपूर, औसा, कर्जत, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, रोहा, कुरडुवादी, धामणगावरेल्वे, वरोरा.

**अनुसूचित जाती महिला आरक्षण नगरपरिषद**

देऊळगावराजा, मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, घुग्गूस, चिमूर, शिर्डी, सावदा, मैनदर्गी, दिगडोहदेवी, दिग्रस, अकलूज, बीड, शिरोळ.

**राज्यातील ६८ नगरपरिषदा महिलांसाठी खुल्या प्रवर्गात राखीव**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी ६८ नगरपरिषदा राखीव केल्या गेल्या आहेत. यामध्ये विविध जिल्ह्यांतील नगरपरिषदा व नगरपंचायतींचा समावेश आहे. यादीमध्ये काही प्रमुख नगरपरिषदा अशी आहेत: परळी वैजनाथ, मुखेड, अंबरनाथ, अचलपूर, मुदखेड, पवनी, कन्नड, मलकापूर-कोल्हापूर, मोवाड, पंढरपूर, खामगाव, गंगाखेड, धरणगाव, बार्शी, अंबड, गेवराई, म्हसवड, गडचिरोली, भंडारा, उरण, बुलढाणा, पैठण, कारंजा, नांदूरा, सावनेर, मंगळवेढा, कलमनूरी, आर्वी, किनवट, कागल, संगमनेर, मुरगुड, साकोली, कुरुंदवाड, पूर्णा, कळंब, चांदूररेल्वे, चांदूरबाजार, भूम, रत्नागिरी, रहिमतपूर, खेड, करमाळा, वसमत, हिंगणघाट, रावेर, जामनेर, पलुस, यावल, सावंतवाडी, जव्हार, तासगाव, राजापूर, सिंदीरेल्वे, जामखेड, चाकण, शेवगाव, लोणार, हदगाव, पन्हाळा, धर्माबाद, उमरखेड, मानवत, पाचोरा, पेण, फैजपूर, उदगीर आणि अलिबाग.

**राजकीय समीकरणात बदलाची शक्यता**

या आरक्षण घोषणेनंतर स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल घडण्याची शक्यता आहे. काही नगरपरिषदांमध्ये विद्यमान नगराध्यक्षांचे आरक्षण बदलल्याने त्यांच्या जागी नवीन चेहरे उमेदवारीसाठी पुढे येतील. दुसरीकडे, अनेक राजकीय पक्ष महिला उमेदवारांना प्रोत्साहन देण्याच्या तयारीत आहेत. आगामी निवडणुकांमध्ये महिलांच्या सहभागामुळे स्थानिक राजकारणात ताजेपणा आणि स्पर्धा वाढेल, अशी प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

**महिला आरक्षणातून नवे नेतृत्व पुढे येणार**

राज्य सरकारने आरक्षण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडल्याचे सांगितले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा, तसेच अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय समाजातील महिलांना संधी मिळावी, हा या निर्णयामागचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. राज्यातील महिलांना नेतृत्वाच्या संधी देण्याच्या दृष्टीने ही सोडत ऐतिहासिक ठरू शकते.

## लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने आयोजित दिव्यांग बालकांसाठी ओळख व तपासणी शिबीर यशस्वी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या पुढाकारातून ३ ऑक्टोबर रोजी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांग बालकांची ओळख आणि तपासणी शिबीर यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. या शिबिराचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा महिला व बाल कल्याण विभाग, प्राथमिक शिक्षणाधिकारी, समाज कल्याण विभाग यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समितीच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर दिव्यांग बालकांची ओळख पटवणे, त्यांची तपासणी करणे, 'दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६'ची माहिती देणे आणि शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, वैद्यकीय अधिकारी आनंद बरगले, सर्व शिक्षा अभियान समन्वयक सतीश भापकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी राजू गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, कार्यवाह डॉ. योगेश निटूरकर, संवेदना सेरेब्रल पाल्सी विकास केंद्राचे अध्यक्ष ॲड. श्रीराम देशपांडे आणि संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृहाचे अण्णा कदम उपस्थित होते. शिबिरात अटी पूर्ण केलेल्या बालकांना शैक्षणिक किट, व्हीलचेअर आणि युडीआयडी कार्ड देण्यात आले.

विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी शिबिरातील विविध स्टॉल्सवरील माहितीचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच, अशा शिबिरांची गरज भासू नये यासाठी जागृती आणि प्रतिबंधात्मक प्रयत्नांची आवश्यकता व्यक्त केली. आता २१ प्रकारच्या दिव्यांगत्वात ॲसिड हल्ल्यामुळे होणाऱ्या व्यंगांचाही समावेश आहे. त्यांनी लघुउद्योगासाठी वित्तीय सहाय्य, विवाह प्रोत्साहन, शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण, निवारा आणि कृत्रिम अवयव यांसारख्या योजनांची माहिती दिली.

डॉ. राजेश पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले की, दिव्यांग बालकांच्या पालकांपर्यंत पोहोचणे, त्यांना शासकीय योजनांची माहिती देऊन लाभ मिळवून देणे, त्यांच्या समस्या जाणून घेऊन विविध थेरपी, उपचार आणि आहार पद्धती उपलब्ध करून देणे, तसेच कमी खर्चात किंवा मोफत औषधोपचार उपलब्ध करून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी सांगितले की, लातूर जिल्ह्यात सुमारे ४० हजार दिव्यांग आहेत, त्यापैकी जवळपास ३५ हजार जणांचे युडीआयडी कार्ड तयार झाले असल्याचे सांगितले.

ॲड. श्रीराम देशपांडे यांनी 'दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६' विषयी सविस्तर माहिती दिली.

शिबिरात १७२ जणांची नोंदणी, ९० जणांची वैद्यकीय तपासणी, २३४ जणांची इ-केवायसी, ३५ युडीआयडी नोंदणी, ४ व्हीलचेअर, २ टीएलएम किट आणि ११ युडीआयडी कार्ड वितरित करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात स्वराज शिंदे आणि समर्थ देशमुख यांना युडीआयडी कार्ड, तर राजवर्धन चौगुले आणि यशराज तळेकर यांना टीएलएम किट देण्यात आले. अदिती चिंचोले यांना व्हीलचेअर प्रदान करण्यात आली. तसेच, शासकीय रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागासाठी दोन व्हीलचेअर देण्यात आल्या. शिबिरात संवेदना सेरेब्रल पाल्सी विकास केंद्र (हरंगूळ, बु.), जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. भालचंद्र रक्तपेढी (थॅलेसेमिया जनजागृती), जिल्हा परिषदेच्या शिक्षण आणि समाजकल्याण विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना (मुरुड), आणि लॉयन्स क्लब ऑफ लातूर 'हेल्पिंग हँड्स' यांनी स्टॉल्सद्वारे सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगेश निटूरकर यांनी, तर राजू गायकवाड यांनी आभार मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बालासाहेब वाकडे, सुरज बाजूळगे, बसवराज पैके, डॉ. रतन जाधव, डॉ. सरस्वती शहारे, शीतल हिप्परगेकर, प्रणिता दबडगावकर, योगेश्वर बुरांडे, संतोष कोळगावे, कृष्णा पोतदार, अन्नपूर्णा बनछरे, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या एम.एस.डब्ल्यू. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## आयटीआयमध्ये रेणापूरची मदिया देशात द्वितीय

### पंतप्रधानांच्या हस्ते सत्कार; गरिबीवर मात करीत घेतले शिक्षण

**लातूर/मोईज सितारी :** गरीब परिस्थितीवर जिद्दीने मात करीत येथील हिने मदिया खदीर सय्यद हिने आयटीआयमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे.त्या बद्दल तिचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी सकाळी दिल्लीतील विज्ञान भवनात सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोहळा सुरू असताना रेणापूर येथील बाजार चौकात फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला.



रेणापूर येथील मदिया सय्यद हिचे वडील खदीर जमाल (मिस्त्री) हे व्यवसायाने बांधकाम मजूर आहेत. त्यांना पाच मुलीच आहेत. हलाकीच्या परिस्थितीतही त्यांनी मुलींना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या सर्व मुलींना शिक्षित आहेत. त्यात मदिया ही बालपणापासूनच अत्यंत हुशार होती. दहावीनंतर तिने येथील स्वातंत्र्यसैनिक मुर्गाप्पा खुमसे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वीजतंत्री (एनएसक्यूएफ) विभागात प्रवेश घेतला. कौशल्य रोजगार व उद्योजकता मंत्रालयाच्या अधिपत्याखालील प्रशिक्षण महासंचालनालयाच्या कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत तिने पहिल्या वर्षी (२०२३-२४) च्या परीक्षेत ६०० पैकी ५९६ गुण मिळविले. त्यानंतर दुसऱ्या वर्षी (२०२४-२५) च्या परीक्षेत ६०० पैकी ५९८ गुण घेतले. ९९.६६ टक्के गुण घेत वीजतंत्री विभागात ती देशात द्वितीय आली. या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी तिचा दिल्लीतील विज्ञान भवनात सत्कार झाला. दरम्यान तिचा सत्कार सोहळा पाहून रेणापुरात शेख खुहुस, आजम सय्यद, जावेद छोटुमियाँ, पंडित बोरूळ, शेख वाजीद, पांडुरंग कोडगीर, राजाभाऊ डावळे, संदीपान यशवंत, आर्दीनी वाजार चौकात फटाके फोडून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. तिच्या या यशाबद्दल प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य व्ही. के. पडवळ, शिल्पनिदेशक अरविंद ताडेवाड, एजाज मुजावर, आर्दीनी कौतुक केले तर मादीया याच्या यशाबद्दल संपूर्ण लातूर जिल्ह्यात कौतुक होत आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



पंजाब कर्नाटक पूरग्रस्तांच्या मदतीत वाढ, राज्यातील शेतकऱ्यांना वाढीव मदतीची अपेक्षा..

## चिमटा दयाचा



लातूरच्या मुख्य रस्त्यावर बेशिस्त दर्शन घडत आहे ! अवघड असले तरी शिस्त लावावी लागणार आहे !!

## मसलगा सिंचन प्रकल्पाच्या दुरुस्तीची कार्यवाही गतीने करावी-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

### पुढील पावसाळ्यात पूर्णक्षमतेने पाणीसाठा होण्याच्या दृष्टीने काम व्हावे

**लातूर/प्रतिनिधी :** मसलगा सिंचन प्रकल्पाच्या भिंतीला भेग पडल्यामुळे ही भिंत खचली आहे. त्यामुळे प्रकल्पाची दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. तांत्रिक बाबींच्या तपासणीनुसार या भिंतीची बांधणी नव्याने करावे लागण्याची शक्यता असून याबाबतच्या कार्यवाहीला गती देण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.





निलंगा तालुक्यातील मसलगा सिंचन प्रकल्पाच्या खचलेल्या भिंतीची पालकमंत्री श्री. भोसले यांनी पाहणी केली. तसेच या अनुषंगाने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, माजी आमदार गोविंद केंद्रे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या प्रशासक तथा अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, निलंगाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गेल्या महिन्यात लातूर जिल्हा दौऱ्यावर असताना आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी मसलगा सिंचन प्रकल्पाच्या दुरुस्तीचा विषय त्यांच्याकडे मांडला होता. या प्रकल्पाच्या दुरुस्तीला तातडीने मान्यता देण्यात येईल, असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी तांत्रिक बाबींची पूर्तता करून याबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच पुढील पावसाळ्यात या प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होण्याच्या दृष्टीने काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी प्रकल्पाची भिंत खचल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून दुरुस्तीचे काम लवकरात लवकर सुरू होणे गरजेचे असल्याचे सांगितले. अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे यांनी प्रकल्पाच्या दुरुस्ती प्रस्तावाच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली.

पालकमंत्री श्री. भोसले यांनी परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून प्रकल्पाची दुरुस्ती लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही दिली.

## मल्लखांब स्पर्धेत ६० मुलींचा ठसा: १२ मुलींची राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** आज प्रत्येक क्षेत्रात महिला-मुली अग्रेसर येत असताना, क्रीडा क्षेत्रातही त्यांनी आपले कौशल्य सिद्ध केले आहे. याचा प्रत्यय लातूर शहरातील क्रीडा संकुलात शनिवारी, दि. ४ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या विभागस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धेत आला. या स्पर्धेत तब्बल ६० विद्यार्थिनींनी आपला सक्रिय सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केली.

लातूर शहर, लातूर ग्रामीण, नांदेड महानगरपालिका, नांदेड ग्रामीण आणि धाराशिव या पाच संघांमधून १४, १७ आणि १९ या तीन वयोगटात एकूण १२० शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, ज्यात मुलांइतकीच (६०) मुलींची संख्या होती. लातुरात झालेल्या या विभागीय स्पर्धेत मुलींनी पुरलेला मल्लखांब आणि दोरीवरचा मल्लखांब या दोन्ही प्रकारात आपल्या कौशल्याचे सादरीकरण केले.

राज्यस्तरावर निवड झालेल्या स्पर्धक मुली १४ वर्ष वयोगट : प्रिया शितळे, वैष्णवही धोरबांडे, आदिती जाधव, भक्ती गरगटे १७ वर्ष वयोगट : प्रतिभा घोरनाड, पूजा परसुरे, श्रद्धा फुगारे, अंजली मुंडे १९ वर्ष वयोगट : अपूर्वा चव्हाण, संस्कृती मोटे, स्वराली खासभागे, वैष्णवी गरगटे

अलिकडे क्रीडा प्रकारात मुलींचा सहभाग वाढला मल्लखांब या क्रीडा प्रकारात मागील काही वर्षांपासून मुलींचा या क्रीडा प्रकारात सहभागी होण्याचे प्रमाण वाढले असून ही सकारात्मक बाब आहे. रोपं बरोबर आता पोल यामध्ये मुलींचा सहभागी होत आहे. - ड. महादेव झुंजे, सचिव, मल्लखांब संघटना.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरिण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकरी आशेवर जीवन जगत आहेत...

अतिवृष्टीमुळे सर्वात नुकसान झाले असेल ते शेतकऱ्याचे तसे सांगण्याची गरज नाही. तरी त्यांना सहकार्य मिळावे, मदत मिळावी म्हणून सांगावे लागते. मुळात महाराष्ट्रातील जनतेचा बहुतांशी व्यवसाय शेती आहे. जर हाच व्यवसाय कोलमोडला तर राज्यात काय होईल याचा विचार केला तर कळून येवू शकेल. अतिवृष्टीने केवळ शेतीचे नाही तर आर्थिक कणा मोडला आहे. राज्यात पैसा खेळला जातो तो शेती व शेतकऱ्यांमुळे ही बाब लक्षात घेतली पाहिजे. अतिवृष्टीने हातात येणारे खरीपाचे पिक निसर्गाने हिरवुन घेतले. पूरजन्यस्थिती निर्माण झाल्याने शेतीतील पिक नष्ट झालेच आहे. त्यापेक्षा अनेक गावांना जोडणारे रस्ते व पुल वाहुन गेले आहेत. त्यामुळे आता सीमावर्ती भागात दैयनिय स्थिती निर्माण झाली असून जगण्याची ओढ निर्माण झाली आहे. अजून पंचनामे चालुच आहेत. पदरात कांही ठिकाणी मदत मिळाल्याचे वृत्त आहे. वास्तविक ग्रामीण भागातील जनतेची जगण्याच्या जिद्दीला सलाम केला पाहिजे. जी मदत सुरू आहे ती कमी आहे. त्यामुळे शहरी भागातील नागरिकांनी मदत करण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधींनी आपले वेतन देण्याची गरज आहे. मुळात राज्यात सर्वाधिक संकट हे शेतकऱ्यावर आले आहे. तरी जगण्याची जिद्द दिसून येते. सध्याला शेतकऱ्याचे जीवन अतिषय वाईट दिसून येते. राणात पाणी आहे, त्यापेक्षा हाताला सोयाबिन लागते का याची ओढ निर्माण झाली आहे. काही तरी पदरात पडेल या आशेने तो शेतीकामास लागला आहे. पाऊस थांबला असला तरी तो पुन्हा पडेल व आहे तेही हिराऊन घेवुन जाईल याची भीती मनात बसली आहे. शेतकरी आपल्याला अनुदान मिळेल, विमा मिळेल. कोणीतरी मदत करेल यासाठी आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरला नाही. तो पुढचे यश पदरात पडेल या आशेने कामाला लागला आहे. आज दळणवळणासाठी रस्त्याची मोठी गरज आहे. रस्त्याची दुरूस्ती करावी लागणार आहे. यासाठी गुत्तेदार आनंदी असतील. आता त्यांना रस्त्याबरोबर पुलाच्या बांधकाम करण्यासाठी ऑर्डर मिळणार आहे. कोणाकडून तरी कामे करून घ्यावी लागणार आहेत. निसर्ग त्यांच्या आज पर्यंत कोपला नाही तो कोपतो तो शेतकऱ्यावर! अंगावर वीज पडून सर्वाधिक मरणारे शेतकरी. जनावरावर संकट आणणारा निसर्ग. घर-घरात पाणी शिरून उघड्यावर आणणारा निसर्ग आहे. त्यामुळे शेतकरी सोडला तर इतरांना त्रास दिसून येत नाही. निसर्ग हा लाभदायक आहे. शेतीतील माती गेली, खरीपाचे पिक गेले, रस्ते व पुल वाहून गेले. याच्या दुरूस्ती करावी लागणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करावा लागेल. रस्ता दिर्घ काळ टिकेल का नाही. पुल वाहुन जाणार नाही याची खात्री कोणीही देत नाही. तरी त्यांना कामे द्यावी लागणार आहेत. ही एक दैवाने दिलेला आशिर्वाद मानला पाहिजे. असे असताना आज शेतकऱ्यावर आलेले संकट कसे सोडविता येईल याचा विचार केला जात नाही. काही ॲडव्हांस रक्कम शेतकऱ्याच्या खात्यावर जमा केली असली तरी ती अपुरी आहे. मुळात दिवाळीचे बोनस जाहिर होईल. शेतकरी सोडला तर बाकीचे आनंदात दिसतील. असे जरी असले तरी शेतकरी शेतात काबाड कष्ठ करतो. पिक काढतो त्यावेळी खायला मिळते. तसा बाजारात सोने खरेदी करणारा दसऱ्याच्या मुहूर्तावर कोण दिसून आला? आज संकटात शेतकरी आहे बाकी कोणीही नाही. उलट पुर आला. पाऊस अधिक पडला हा काहींच्या फायद्यासाठी ठरला आहे. केवळ आणि केवळ पावसाने संकट शेतकऱ्यावर आणले आहे हे मान्य केले पाहिजे. केवळ मान्य करून चालणार नाही तर त्यांना मदत करण्याचे धोरण आखणे आवश्यक आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर पाच मोठे मेळावे झाले. त्यांचा खर्च अनेक लाखोंचा असू शकतो. हे पाच मेळावे रद्द करून तीच रक्कम शेतकऱ्यासाठी वापरली असती तर संकट काही प्रमाणात कमी झाले असते. वरचेवर शेतकऱ्याकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. आता दिवाळीपुर्वी मदत करणार असे जाहिर केले आहे. आता सांगा दिवाळी किती दिवस दूर राहीली आहे. तोंडावर आली आहे. दसरा संपला आता दिवाळीची चाहुल लागली आहे. मदत यापुर्वी केलीच आहे त्यापेक्षा अधिक पटाने देतीलच असे नाही. तुटपुंजी मदत दिली आहे. शेतीचे नुकसान मोठे आहे. त्या प्रमाणात मदतीची गरज आहे. आज पर्यंत भरघोष मदत केल्याचे आठवत नाही. एक तर ओला दुष्काळ जाहिर झाला नाही तो होणार नाही असे दिसून येते. असे जरी असले तरी प्रत्यक्षात मदतीचा आकडा अजून जाहिर झाला नाही. तो तरी जाहिर झाला असता तर त्या जाहिर झालेल्या आकड्यावर जर जीवन जगले जाऊ शकेल. तसे पाहिले तर आज पर्यंत शेतकरी आशेवरच जीवन जगत आला आहे. कधी शौकचैन केली नाही. त्याला वेतन आयोगाचा लाभ मिळाला नाही. त्याने कष्ठाने पिकवलेल्या मालास मालक असून भाव ठरविण्याचा अधिकार दिला नाही. केवळ कृषी प्रधान देश म्हणून फुगविले जाते. मुळात शेतकरी तक्रार करीत नाही, कधी आंदोलन करीत नाही. संकट झेलण्यात पटाईत कोण असेल तर शेतकरी आहे हे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे आता कृषीप्रधान देशाने जेवढे शक्य असेल तेवढी अधिक मदत केली पाहिजे. किमान मदत जाहिर तरी केली पाहिजे. मुळात आपल्या देशात मागासलेला पना हा शेतकऱ्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे आहे. शेतीकडे वळण्याचा कल कमी झाला आहे. कष्ठ करणारी मंडळी कमी होत आहे. याचा परिणाम आगामी काळात चांगला होणार नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे वेळकाढूपना बाजूला सारून तातडीने मदत जाहिर करावीच त्यापेक्षा काही तरी रक्कम खात्यात जमा केल्यास आगामी दिवाळीचा मोठा सण आनंदात जाईल. शेतात पाणी असल्याने रब्बीचे आशा फार कमी आहे. हे वर्ष शेतकऱ्यासाठी योग्य दिसून येत नाही. आपल्या देशात प्रगत हवामान विभाग असता तर पुर्व कल्पना मिळाली असती. किमान काही प्रमाणात नुकसान तरी टाळता आले असते. आज वाईट यासाठी वाटते की, अतिवृष्टी ही केवळ शेतकऱ्यावर संकट निर्माण करणारी ठरली तर इतरासाठी लाभदायक ठरली हे दुःखाने म्हणावे लागेल. जी मदत दिली जात आहे ती अपूरी आहे. नुकसान मोठे आहे याचा विचार झाला पाहिजे.

# लातूर जिल्ह्यात १७४ उमेदवारांना शासकीय सेवेत नियुक्ती!

**– शासकीय नोकरी ही समाजसेवेची संधी समजून काम करा– पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले – अनुकंपा धोरणातील बदलामुळे नियुक्ती प्रक्रिया गतिमान**



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात १०३ अनुकंपाधारक उमेदवारांना गट-क आणि गट-ड संवर्गात, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे (एमपीएससी) सरळसेवा परीक्षेतून निवड झालेल्या ७१ उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. शासकीय सेवेत दाखल झालेल्या या सर्व नवनियुक्त उमेदवारांनी शासकीय नोकरी ही समाजसेवेची संधी समजून काम करावे आणि आपल्या सेवेतून समाज व जिल्ह्याच्या विकासाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते अनुकंपा तत्त्वावर गट-क, गट-ड संवर्गातील आणि एमपीएससीद्वारे लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर महानगरपालिका आयुक्त मानसी आणि अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांची प्रमुख उपस्थिती होते. मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या नियुक्ती आदेश प्रदान कार्यक्रमाचे थेट प्रसारण या जिल्हास्तरीय कार्यक्रमात दाखवण्यात आले. लातूर जिल्ह्यात गट-क संवर्गातील ३७ आणि गट-ड संवर्गातील ६६ अशा एकूण १०३ अनुकंपाधारक उमेदवारांना, तसेच एमपीएससीद्वारे लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या ७१ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले. यावेळी पालकमंत्री श्री. भोसले, सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात आदेशांचे वितरण करण्यात आले.

राज्य शासनाने अनुकंपा धोरणात केलेल्या बदलांमुळे नियुक्ती प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान झाली आहे. लातूर जिल्ह्यात गेल्या अडीच महिन्यांत प्रशासकीय स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे १०३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळाली. तसेच, एमपीएससीद्वारे निवड झालेल्या ७१ उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आली. यामुळे शेतकरी कुटुंबातील युवक-युवतींना शासकीय सेवेची संधी मिळाली आहे. या सर्व उमेदवारांनी शेतकरी आणि समाजातील गरीब घटकांच्या सेवेसाठी प्रामाणिकपणे काम करावे आणि जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे पालकमंत्री भोसले यांनी सांगितले.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने मार्गी लागली आहे, याबद्दल सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांचे आभार मानले. आज एकाच दिवशी जिल्ह्यातील १०३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळाली आहे. यामुळे आपल्या कुटुंबातील सदस्य गमावलेल्या कुटुंबांना आधार मिळणार आहे. तसेच, सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती मिळालेल्या ७१ उमेदवारांचे शासकीय नोकरीचे स्वप्न पूर्ण झाले आहे. या सर्व नवनियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे सहकार मंत्री यावेळी म्हणाले.

शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि सचोटीने पार पाडून समाजाची सेवा करावी, असे आमदार विक्रम काळे यांनी सांगितले.

राज्यात प्रथमच एकाच दिवशी इतक्या मोठ्या संख्येने नियुक्त्या देण्यात येत असल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानत आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी १७४ उमेदवारांचे अभिनंदन केले.

नवीन अनुकंपा धोरणामुळे नियुक्ती प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान झाली आहे. अनुकंपाधारक आणि एमपीएससीद्वारे निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी शासकीय योजनांचा आणि सेवांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यावेळी म्हणाल्या.

प्रारंभी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी प्रास्ताविकात अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेची माहिती दिली. नवीन अनुकंपा धोरणामुळे ही प्रक्रिया गतिमान झाल्याचे त्यांनी नमूद केले.

**गतिमान आणि पारदर्शक प्रक्रियेबद्दल उमेदवारांनी मानले शासन, प्रशासनाचे आभार !**

गेल्या काही वर्षांपासून विविध तांत्रिक आणि प्रशासकीय अनुकंपाधरकांची नियुक्तीची कार्यवाही रखडली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुकंपा नियुक्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. सातत्याने प्रशासकीय बैठकांमध्ये त्याचा आढावा घेतला आणि नवीन अनुकंपा धोरण तयार करण्यात आले. त्यामुळे अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया गतिमान आणि सुलभ झाली. या अंतर्गत जिल्ह्यातील १०३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यात मिळाली आहे. नियुक्ती आदेश स्वीकारल्यानंतर या उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य शासनाचे आणि जिल्हा प्रशासनाचे आभार मानले. यासोबतच एमपीएससीद्वारे घेण्यात आलेल्या पारदर्शक परीक्षेमुळे लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या उमेदवारांनीही शासनाचे आभार मानले.

## बागायती शेतकऱ्यांना फळबाग व पिक नुकसानीसाठीजास्तीची मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करू– माजी आ. कव्हेकर


**लातूर/प्रतिनिधी :** नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे महाराष्ट्रासह मराठवाडा व लातूर जिल्ह्यातील लाखो हेक्टरवरील पिके व जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच काही विहिरी बुजून गेल्या आहेत व पाईपलाईनही पुरामुळे वाहून गेलेल्या आहेत. याचे सरसकट पंचनामे करून सर्वतोपरी मदत करण्याचे काम शासनाने करावे. परंतु यामध्ये बागायती शेतकऱ्यांना जास्तीची मदत द्यावी. सांगली जिल्ह्यामध्ये २०१८ मध्ये कृष्णा नदीच्या पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ३२ हजाराची मदत करण्यात आली होती. त्यामुळे आताही बागायती शेतीसाठी जस्तीची मदत मिळावी यासाठी आपण पाठपुरावा करू असा विश्वास माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी टाकळगाव, तांदुळजा, सारसा, कानडी बोरगाव येथील अतिवृष्टी पाहणी दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधताना व्यक्त केला.

# तामलवाडी टोल प्लाजा येथे दोन दिवसीय डिजिटल प्रदर्शनाचे आयोजन

**– तुळजापूरला पायी चालत जाणाऱ्या भाविकांना मिळणार केंद्र शासनाचे ११ वर्ष सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणविषयी माहिती – केंद्रीय संचार ब्यूरो आणि जिल्हा पोलिस प्रशासन धाराशिव यांचे कोजागिरी पौर्णिमानिमित्त विशेष उपक्रम**

**तुळजापूर/प्रतिनिधी :** माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या वतीने कोजागरी पौर्णिमानिमित्त तामलवाडी टोल प्लाजा येथे दिनांक ५ ते ६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये केंद्र शासनाचे ११ वर्ष सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या विषयांवर दोन दिवसीय डिजिटल मल्टीमीडिया प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव यांनी दिली. सदर प्रदर्शनाचे उद्घाटनासाठी जिल्ह्यातील खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन चोवीस तास सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

या प्रदर्शनामध्ये पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या निर्णायक नेतृत्वाखाली भारताने माघील ११ वर्षात विविध क्षेत्रात केलेली कामगिरी, देशात जलदगतीने होत असलेली विकासकामे आणि धोरणांची माहिती सह विकसित भारताचा अमृत काळामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रम विषयीची माहिती या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आली आहे. सोबत गरीब वंचित, आदिवासी,




महिला, युवा, शेतकरी, उद्योजक आणि मध्यमवर्गाच्या विकासासाठी घेण्यात आलेले निर्णय, उज्वला गॅस योजना, डिजिटल इंडिया, पंतप्रधान पीक विमा योजना, किसान सन्मान योजना, आवास योजना, पीएम श्री योजना, मुद्रा योजना, आयुष्मान भारत सारख्या कल्याणकारी योजनांची माहिती, पायाभूत सुविधांमध्ये होत असलेली विकासकामे, देशाची सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि ऑपरेशन सिंदूर इत्यादी विषयांची माहिती चित्र, आकडेवारी, मजकूर आणि ऑडीओ-व्हिडीओ च्या माध्यमातून नागरिकांना पाहता येणार आहे.

केंद्र सरकारच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या सोलापूर येथील, केंद्रीय संचार ब्युरोच्या वतीने व जिल्हा व पोलिस प्रशासन शासनाच्या सहकार्याने तामलवाडी टोल प्लाजा येथे दोन दिवसांकरिता मल्टिमिडीया डिजिटल प्रदर्शन भरविणयात येत आहे. भाविकांसाठी प्रदर्शनातील माहितीवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेऊन विजेत्यांना ताबडतोब बक्षिसे देखील देण्यात येणार आहे तसेच स्थानिक लोक कलावंत यांच्याकडून भारुड, शाहिरी पोवाडा सारख्या प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

कोजागिरी पोर्णिमा निमित तुळजाभवानी मातेच्या दर्शनाकरिता पायी चालत येणाऱ्या महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश राज्यातील भाविकांना केंद्र शासनाने माघील ११ वर्षात घेतलेले निर्णय, धोरणे आणि विविध कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून जास्तीत जास्त भाविकांनी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकाकडून करण्यात आले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून आरोग्य विभागाकडून आढावा



**निलंगा/आयुब बागवान :** जिल्ह्यात झालेला अतिवृष्टीमुळे काही भागात पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने अशा पूरग्रस्त गावात जलजन्य, किटकजन्य व साथीच्या विविध आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत दि.०१ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर २०२५ दरम्यान जिल्ह्यातील एकूण १०३ पूरग्रस्त गावात आरोग्य पथकांची नेमणूक करून साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव होऊ नये या करिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

या अनुषंगाने, आज दि. ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राहुल कुमार मीना यांनी निलंगा तालुक्यातील माने जवळगा व सावरी या पूरग्रस्त गावास प्रत्यक्ष भेट देऊन आरोग्य विभागामार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेतला. या वेळी सदर गावात नियुक्त केलेल्या आरोग्य पथकाकडून त्यांनी पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण, पाणी नमुने तपासणी, साथरोग सर्वेक्षण, उपलब्ध औषधीसाठा, डासांची पैदास होऊ नये म्हणून अबेटींग, धूर फवारणी, आरोग्य शिक्षण व जनजागृती बाबत माहिती घेऊन सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी संबधीतांना सूचना दिल्या.

तसेच, गावातील नागरिकांशी संवाद साधला. या वेळी, नागरिकांनी पूरपरिस्थितीनंतर साथीच्या आजारांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन केले. तसेच, या भेटी दरम्यान त्यांनी उपकेंद्र सावरी व प्राथमिक आरोग्य केंद्र हालगरा येथे भेट देऊन या दवाखान्याव्दारे देण्यात येणाऱ्या सोई सुविधांचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, गटविकास अधिकारी श्री पाटील,

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदिपकुमार जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील पोतदार व इतर आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, लातूर

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा गाझामधील ट्रम्प यांच्या शांतता योजनेला पाठिंबा; भारत नेहमीच शांततेचा समर्थक, मोदींनी स्पष्ट्च सांगितलं

नवी दिल्ली: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हमासला शांतता करारास सहमती देण्यासाठी रविवारी ५ ऑक्टोबर ही अंतिम मुदत दिली होती. ट्रम्प यांनी म्हटले होते की, जर हमास या अंतिम मुदतीत सहमत झाला नाही, तर त्यांना अभूतपूर्व कारवाईला सामोरे जावे लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये हा अल्टिमेटम दिला होता. त्यानंतर हमासने त्यांची सूचना स्वीकारली असून, इस्रायली बंधकांना सोडण्यास सहमती दर्शविली आहे. दरम्यान, इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही त्यांच्या कारवाया थांबवण्याचे आदेश दिले आहेत.

## जिल्हा क्रीडा संकुलात संस्कार स्वच्छता -स्वभाव स्वच्छता अभियान संपन्न

**५३ महाराष्ट्र बटालियन एन.सी. सी. लातूर आणि दयानंद वाणिज्य महाविद्यालय यांचा संयुक्त उपक्रम**



**लातूर/प्रतिनिधी :** येथील ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना लातूर व दयानंद वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर २०२५ रोजी ''स्वच्छता ही सेवा पंधरवाडा'' निमित्त ''संस्कार स्वच्छता– स्वभाव स्वच्छता''या उपक्रमांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदरील अभियान चे उद्घाटन कमांडिग ऑफिसर कर्नल संतोष आनौगान यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील अभियान कमांडिग ऑफिसर कर्नल संतोष आनौगान, प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. यावेळी कैप्टन डॉ. विजेंद्र चौधरी,लेफ्टनंट डॉ .साईनाथ उमाटे, लेफ्टनंट डॉ.महेश वावरे,जिल्हा क्रीडा अधिकारी माधव कसगावडे,सुभेदार मेजर संभु सिंह,सुभेदार हरेंद्र सिंह, सुभेदार शेख पाशा, सुभेदार संजय चिकने, सुभेदार उत्तम पाटील,नायब सुभेदार बाजीराव पाटील, आदी ची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी बोलताना कर्नल संतोष आनौगान म्हणाले की, 'स्वच्छता ही सेवा' हे वृत्त घेऊन समाजात काम करणे गरजेचे आहे. आज समाजामध्ये प्रामाणिकपणे काम करणाऱ्याची संख्या कमी झाली,असून राष्ट्रीय छात्र सेना कॅडेटच्या माध्यमातून प्रत्येक समाजामध्ये, गावामध्ये, वस्तीमध्ये, स्वच्छतेचा जागर घालणे आवश्यक असून, प्रत्येकाने आपापल्या परीने ''संस्कार स्वच्छता – स्वभाव स्वच्छता''ही सेवा' करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

यावेळी लातूर जिल्हा क्रीडा संकुल परिसरामध्ये स्वच्छ्ता ही सेवा अभियान राबवून परिसरातील कचरा व प्लास्टिक मुक्त करण्यात आला. जवळपास चार ट्रॅक्टर ट्रॉली कचरा कॅडेट ने स्वच्छता करून क्रीडा संकुल हे सुशोभित केले.कॅडेट ने स्वच्छ्ता दुत म्हणून कार्य केले हे कौतुकास्पद होते.या अभियानात लातूर शहरातील दयानंद कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, राजर्षी शाहू महाविद्यालय,महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, देशी केंद्र विद्यालय, यशवंत विद्यालय, व्यंकटेश विद्यालय , ज्ञानेश्वर विद्यालय, मारवाडी विद्यालय आदी मधील ३०० हून अधिक कॅडेट आणि कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गाझा शांत होईल..?

ट्रम्प यांची शांतता योजना इस्रायलला अनुकूल असल्याचे हमासचे मत चुकीचे नाही; पण इस्रायल व त्यांचे पाश्चात्य मित्र यांच्या पुढे हमासची ताकद तोकडी आहे. त्यांनी ही योजना स्वीकारणे शहाणपणाचे ठरेल.

इस्रायल आणि 'हमास' यांच्यातील गेली दोन वर्षे सुरु असलेले युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक शांतता योजना जाहीर केली. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी ट्रम्प यांची भेट घेतल्यानंतर ही योजना जाहीर करण्यात आली. इस्रायलने ती मान्य केल्याचे अधिकृतरीत्या जाहीर केलेले नाही; पण बहुधा नेतान्याहू यांची त्यास संमती असावी. हमासने अजूनतरी ती मान्य केलेली नाही. ट्रम्प यांनी हमासला ही शांतता योजना स्वीकारण्यासाठी तीन-चार दिवसांची मुदत दिली आहे. जर त्यांनी ती अमान्य केली, तर 'खूप दुःखद अंत होईल' असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे. याचा अर्थ इस्रायल गाझा पट्टीतील हल्ले अधिक तीव्र करेल, त्यात आणखी पॅलेस्टिनी नागरिक मारले जातील असा आहे. गेल्या महिन्यात संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने गाझा पट्टीतील युद्ध थांबवण्यासाठी एक ठराव संमत केला. त्या भागात दोन देश असावेत अशा आशयाचा हा ठराव आहे. भारतासह १४२ देशांनी त्यास पाठिंबा दिला; पण अमेरिका व इस्रायलने विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर इस्रायल नवी शांतता योजना मान्य करेल का? ही शंका आहे. या योजनेत हमासला दोषी ठरवलेले नसले तरी, ती इस्रायलला झुकते माप देणारी आहे. अरब देशांनी या योजनेला पाठिंबा दिला आहे.


भारतासाठी महत्त्वाची योजना-

हमासने शस्त्रांचा त्याग करून शरणागती पत्करावी हा या योजनेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. हमासचे जे सदस्य शस्त्रे सोडून 'शांततापूर्ण सहअस्तित्व' मान्य करतील त्यांना ते जेथे जाऊ इच्छितात तेथे जाण्यासाठी पूर्ण सुरक्षा दिली जाईल, असे या योजनेत म्हटले आहे. गाझा पट्टीत हमासने जवळपास दोन दशके 'राज्य' केले आहे. हे कलम मान्य करणे त्यांच्यासाठी बरेच अवघड आहे. त्यांचे सदस्य कतार, जॉर्डन, इजिप्त किंवा इराणला जाण्याची शक्यता जास्त आहे. या देशांनाही इस्रायल शत्रू मानतो. अलीकडेच हमासच्या नेत्यांना 'संपवण्यासाठी' इस्रायलने कतारची राजधानी दोहा येथे हवाई हल्ले केले होते. हमासने ही शांतता योजना मान्य केली तरी त्यांच्या सदस्यांना इस्रायल 'सुरक्षितपणे'बाहेर जाऊ देईल का? ही शंका आहे. गाझा पट्टीत सरकार स्थापण्याची कल्पना या योजनेत नाही. स्थानिक रहिवाशांना मूलभूत नागरी सुविधा पुरवण्यासाठी हंगामी प्रशसकीय व्यवस्था निर्माण करण्याचे त्यात म्हटले आहे. गाझा भागात शांतता नांदावी या हेतूने एक आंतरराष्ट्रीय स्थिरता दल स्थापण्याची कल्पना यात आहे. अमेरिका, अरब देश व अन्य आंतरराष्ट्रीय सहकारी देश हे हंगामी दल स्थापन करतील. पॅलेस्टाइन व गाझा पट्टीतील पाणी पुरवठा, वीज पुरवठा, इमारती बांधणे आदी मूलभूत सेवा पुन्हा उभारण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानवतावादी मदत या भागात पुन्हा सुरु करण्याचेही या योजनेत म्हटले आहे. इस्रायलने या भागातील मानवतावादी मदतही रोखली. गेल्या दोन वर्षांत इस्रायलने बेफाम हवाई व जमिनीवरील हल्ल्यांत हा भाग उद्ध्वस्त केला आहे. रुग्णालये, शाळा, निर्वासितांच्या छावण्या यांनाही त्याने लक्ष्य केले. अन्न घेण्यासाठी झालेल्या गर्दीवरही बॉम्बफेक केली. गेल्या दोन वर्षांत या हल्ल्यांत किमान ६६ हजार जण मारले गेले आहेत. उपासमारीने अनेकांचे बळी गेले. जग याला 'नर संहार' म्हणत आहे. नेतान्याहू अति उजव्या विचारांचे आहेत. ते मुस्लिम द्वेष्टे आहेत. निष्पाप बालके, महिला, वृद्ध नागरिक यांची हत्या करणे त्यांना गैर वाटत नाही. ट्रम्प देखील त्यांची बाजू घेतात.पॅलेस्टाइनला सहानुभूती दाखवणे म्हणजे ज्यूंना विरोध असे त्यांचे मत आहे. पॅलेस्टिनी नागरिकांची बाजू घेणे म्हणजे मुस्लिमांची बाजू घेणे असे मानणारे भारतातही अनेकजण आहेत. मुस्लिमांची हत्या करणे योग्य आहे असे या उजव्या विचारांच्या व्यक्ती व गटांचे मत आहे. इस्रायलसह पश्चिम आशियात सुमारे ९० लाख भारतीय आहेत. त्या भागात भारताची गुंतवणूकही मोठी आहे. देशास खनिज तेलाचा मोठा पुरवठा याच प्रदेशातून होतो. त्यामुळे गाझा पट्टीत शांतता निर्माण होणे भारतासाठीही महत्त्वाचे आहे. ती



# माफ करा बापूजी

**प्रिय बापू...**
संवाद व्हावा म्हणून बोलतो आहे..
मनात खूप साठले आहे.. सांगावे की नको
अशी द्विधा स्थिती आहे मनात..
अखेर धाडस करून ठरून टाकले..
सांगून टाकावे खरे सारे..
तुम्ही मिळविलेले स्वातंत्र्य
देशाला मिळाले आहे..
सामान्य माणसांला कधी मिळणार?
यांची प्रतिक्षा आहे.
त्याच्या आवाजासाठी तुम्ही लढत
राहिलात.. तरी पण
त्याचा आवाज आता ऐकू येत नाही..
त्याला आवाज असतो का ?
अशी शंका येते मनात..
आणि असेच असते सारे काही
असे म्हणत मनाचे होते समाधान.
बापू...
सध्या देशाचे भले सुरू आहे
हातात हात घालून खाणे सुरू आहे.
तुमच्याच विचाराने आमचा
प्रवास सुरू आहे..
सत्याचा मार्ग आम्ही चालतो आहोत..
अंहिसेचा विचार झेलतो आहोत..
अपरिग्रहाची वाटही धरतो आहोत..
अस्तेयचा विचारही येतो मनामध्ये..
ब्रम्हचर्याची आठवणही होते..
तुमची वाट तुम्ही चालत राहिलात.
आज ती तुडविताना..
जरा कठीण जाते आहे..
सत्याच्या वाटेने निघालो होतो....
पण त्या वाटेने गर्दी म्हणून
काही दिसली नाही..
तुमच्या वाटेवर असेल गर्दी
माणसांची असे वाटले...
पण छे हो..काही सुध्दा नव्हती गर्दी.
मनाला चुकल्या सारखे झाले...
आणि समोर पाहू लागलो.
तेथे तर गर्दीचा महापूर दाटून आला...
आम्हाला वाटले आमची वाट चुकली..
मग प्रवास सुरू केला..
चालता चालता पोहचलो एकदाचा.
निघालो होतो सत्याच्या वाटेने आणि
सत्तेच्या वाटेवर पोहचलो..
यात आमचा काय दोष?
बापूजी...
अंहिसेची वाट धरली, तिथे
पुन्हा गर्दी नव्हती..
मग चालत राहिलो आणि हिंसेच्या
गर्दीत पोहचलो.
लोक तर सारखे धावत होते..
सत्तेच्या सोपानाकडे..
प्रचंड धावाधाव..
एकमेकाला मागे सारत..
प्रत्येक जण धावत होता..
धावण्याला गती होती पण तत्त्वे,
मूल्य स्थिर होती.
मूल्यांचे काय झाले? याचा शोध
घेऊ लागलो..
तेव्हा कोणी ओरडले..
आहेत सारी तत्वे आणि मूल्ये..
जपून ठेवली आहेत
उद्या सत्तेच्या सभेत भाषणाला
लागतील म्हणून..
सत्तेचा सोपान अहिंसेने चढणे
सोपे थोडेच आहे.. ?
सत्याच्या वाटेने चालण्या एवढा
धीर तरी कोठे आहे.. ?
सत्याच्या प्रकाशात स्वतःला शोधतांना..
ही वाट सोपी नाही..असा साक्षात्कार
होत जातो..
मग सोडून दिले तुमचे बोट..
होतो कधी कधी पश्चाताप..
तुमचे बोट सोडले म्हणून...
आणि मग धरली सत्तेची
वाट..
आणि सापडला
राजमार्ग
आता तेथून
माघारी फिरणे
शक्य नाही...
सारे काही ठिक
सुरू आहे..
सत्तेच्या सावलीत
आता मन रमतय.
तुमच्या सहवासात
जीव गुदमरतोय
गांधीच्या अपरीग्रहाचे काय
झाले ?
असे विचारले..
तर कोणी तरी म्हणाले..
बापूंचा अपरीग्रह ठीक होता..
त्यांच्यावेळी..
आम्हाला पोर हाय..बायका हाय..
त्यांची व्यवस्था लावायला नको..?
बापू प्रत्येक वेळी कर्तव्य करा
अस सांगत होते..
आता तुमच्याच वाटेने चालतोय..बापू.
फार काही कमवले नाही..
दोन चार पिढया खातील बसून...
बसं इतकच..
ते कमवितांना हिंसेची वाट धरली नाही.
तुमचा मार्ग सोडला नाही..
सारं कसे अंहिसेने...सुरू आहे




बापू..
काम अडवून
पाहिले...मात्र हल्ला
केला नाही..
मग त्यांनेच दिले
न मागता..आणि
असे मिळत गेले
आणि कमवत
गेलो...
अंहिसेच्याच वाटेने
कोटीचे कोटी उड्डाने
होत गेली..
आणि समाज सेवेत मन
रमत गेले..
बापू...
तुम्ही अस्तेयच्या वाटेने चालायला
शिकविले.. विचार पक्का केला..
हीच वाट आहे आपल्या विकासाची..
चालत राहिलो या वाटेने...
कधीच काहीच अस्तेय केले नाही..
देशाची संपत्ती मिळवत गेलो..
पण कोणा भारतीयावर अन्याय नाही
केला..
देशाची संपत्ती आहे..त्यावर
भारतीय म्हणून हक्क आहे..
हक्कासाठी लढता लढता सारे
काही मिळत गेले..
पण अस्तेयची वाट सोडली नाही..
पण तरी सुद्धा खूप मिळाले..
बापूजी...
तुमच्या वाटेने चालतांना
सत्याची वाट सुटली नाही..
खरंच सारे चुकते आहे असे
आतून वाटत गेले..
असत्याची वाट तुडवावी वाटली
तर मन चालत जाते..
आतून मात्र वाटत राहाते...
आपण असत्याने चाललो आहोत
असत्याच्या अंधारात...
सत्याची वाट चमकून जाते..
मात्र सापडतांना काहीशी अंधूक होते...
आणि
सत्याच्या प्रकाशात डोळे दिपून जातात..
बापू...
तुमचा सारा प्रवास तसा कठीण होता..
आता विचार केला तरी धस्स होते..
वर्तमानात चालणे आणखी
कठीण होते आहे..
देशाची सर्वांना चिंता आहे..
प्रत्येकाला विकास हवा आहे.
प्रत्येकाच्या विकासातच दडलाय..
भारताचा विकास..
म्हणूनच प्रत्येक जण करतोय
स्वतःचा विकास..
आज माणसांचा होईल, अन् उद्या दे-
शाचा...
एक दिवस सर्वांचा विकास होईल..
मग भारतचाही विकास होईल.
त्या विकसित भारतात... असेल का गर्दी
माणसांची ?
बापू, आज भोवताल शोधतांना.. सारेच
काही हरवले
तुमची मूल्ये, तत्वे आणि दृष्टी देखील..
शोधा शोध करतांना तुमचा
भिंतीवरचा फोटो दिसतो.
फोटोकडे पाहात तुमच्याशी संवाद साधतो..
बरे झाले बापू तुम्ही आज नाही..
नाहीतर तुम्हालाच हा आपलाच
भारत का ?
असा प्रश्न पडला असता...
तुमचे नाव घेत सुरू आहे आमचा
कारभार फक्त
विचाराचे बोट सुटले.. बाकी सारे
ठीक आहे.
बापू...
तुम्ही आम्हाला माफ करा..
बराच विकास झाला आहे..
अस्पृश्यता कायद्याने संपली आहे
मनामनात जात आहे...
दारादारात धर्म आहे..
जातीसाठी धर्मासाठी माणसं
मारली जाता आहेत..
आणि तरी आम्ही धर्मनिरपेक्ष
आहोत बापूजी..
खूप काही लिहिले... माफ करा बापूजी..
तुम्ही क्षमाक्षील आहात.. त्यामुळे माफ
कराल याची खात्री आहे. म्हणूनच हा पत्र
लिहिण्याचा आगाऊपणा केला आहे.

## अल्झायमर समजून घेताना... डॉक्टर टीप्स

**अल्झायमर प्रतिबंध**

- आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो.ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.



**अल्झायमरग्रस्तांना समजून घेताना...**

- या आजारावर निश्चित वैद्यकीय औषधे अद्याप नाहीत. काही औषधांचा वापर केला जातो, पण उपयोग मर्यादित आहे. याशिवाय अधिक संशोधन सुरू आहे.
- घरातील इतर व्यक्तींवर या आजारी माणसाची विशेष जबाबदारी येऊन पडते, त्यांनी संवेदनेने या रुग्णांना समजून घ्यायला हवे.- सुरक्षितता : आजुबाजूची खोली, वस्तू, व्यवहार सुरक्षित होतील अशी काळजी घ्यायला हवी.




## विनोद

गिऱ्हाईक : मी एक चूक केली.
वेटर : काय झाले साहेब?
गिऱ्हाईक : तुला 'टिप' द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली.
वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

Movie titles related to engg students:
exams – socha na tha,
classes – kabhi kabhi,
question papers – na tum jano na hum,
copying – yaarana,
maths2 – asambhav,
maths1 – mission impossible,
environmental sciences – pyar mein kabhi kabhi,
1st semester – kuch to hai,
2nd semester – yeh kya ho raha hai,
distinction – kal ho na ho,
1st class – raju bangaya gentleman,
2nd class – dil mange more
fail – phir milenge

## संदेश




राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.
– अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ।।**

**अर्थ –** अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

## महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

### उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दुःख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दुःख, हळहळ

### आडवे उत्तर

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

### उभे उत्तर

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारत-पाकिस्तान महिला विश्वचषक सामन्यात टॉस दरम्यान गोंधळ

**मॅच रेफरीकडून गंभीर घोटाळा**

**कोलंबो**–कोलंबोच्या आर प्रेमदासा स्टेडियममध्ये सुरू असलेल्या महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लीग सामन्यात टॉस दरम्यान एक मोठा गोंधळ झाला आहे. या घटनेत मॅच रेफरीने चुकीचा निर्णय दिल्याचा आरोप होत असून, त्यामुळे भारतीय संघाची स्पष्टपणे अडवणूक झाल्याचे बोलले जात आहे.भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर हिने नाणेफेक केली आणि पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने ''टेल्स'' असा कॉल केला. मात्र, नाणे ''हेड्स'' असे पडल्याचे स्पष्टपणे दिसून आले. त्यामुळे नियमानुसार भारताने टॉस जिंकला असता. पण मॅच रेफरी शँड्रे फ्रिट्झ आणि टॉस होस्ट मेल जोन्स यांनी ''हेड्स'' कॉल असल्याचे सांगितले आणि पाकिस्तानला विजयी घोषित केले.यानंतर, फातिमा सनाला निर्णय विचारण्यात आला आणि तिने लगेच गोलंदाजीचा निर्णय घेतला. या सगळ्या घडामोडी सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे.हरमनप्रीत कौरने त्याक्षणी काही प्रतिक्रिया दिली नाही, त्यामुळे तिला कॉल योग्य ऐकू आला नव्हता का? याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

***

### पाकिस्तानी प्लेअरनी मारला स्प्रे, गोंधळानंतर अंपायरनी मॅच थांबवली!

कोलंबो–आशिया कपमध्ये लागोपाठ ३ रविवारी पाकिस्तानला धूळ चारल्यानंतर आता भारतीय महिला टीमही पाकिस्तानच्या महिला टीमला धक्का द्यायला तयार आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोलंबोमध्ये महिला वर्ल्ड कपचा सामना सुरू आहे. या सामन्यात पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, यानंतर टीम इंडियाची सुरूवात खराब झाली. १५९ रनवरच भारतीय टीमच्या पहिल्या ५ विकेट गेल्या होत्या.भारत–पाकिस्तान यांच्यातल्या या सामन्यात गोंधळ पाहायला मिळाला, त्यामुळे सामना काही काळासाठी थांबवला गेला. कोलंबोमध्ये सुरू असलेल्या या सामन्यावेळी मैदानामध्ये अचानक मोठ्या प्रमाणावर छोटे किडे आले. या किड्यांना हटवण्यासाठी पाकिस्तानी खेळाडूंनी स्प्रे मारला. तरीही किडे जात नव्हते, अखेर अंपायरनी थोड्या वेळासाठी मॅच थांबवली. किड्यांचा हटवण्यासाठी मैदानातील कर्मचारी धुराचं मशीन घेऊन आला आणि त्याने मैदानात फवारणी केली. फवारणीमुळे

***

### टीम इंडियाने नोंदवला नकोसा विक्रम

**दिल्ली**–आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारत विरुद्ध पाकिस्तान सामना सुरू आहे. वर्ल्डकप स्पर्धेचे यजमानपद भारताकडे आहे. पण पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेतील कोलंबोत खेळवले जाणार आहेत. या सामन्यात भारतीय संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. दरम्यान भारतीय संघाचा संपूर्ण डाव २४७ धावांवर आटोपला. भारताची शेवटची फलंदाज बाद होताच टीम इंडियाच्या नावे नकोसा विक्रम नोंदवला गेला आहे.या सामन्यात पाकिस्तानच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. भारताकडून सलामीला आलेल्या फलंदाजांनी ४८ धावांची सलामी दिली. प्रतिका रावलने ३१ धावा केल्या,तर स्मिृती मांधना २३ धावांवर माघारी परतली. भारतीय संघाला हवी तशी सुरूवात मिळाली नव्हती. त्यानंतर हरलिन देओलने हातभार लावत ४६ धावांची खेळी केली. कर्णधार हरमनप्रीत कौरदेखील या सामन्यात फार काही करू शकली नाही. ती अवघ्या १९ धाव करत माघारी परतली. जेमिमा रॉड्रिग्ज ३२, दिप्ति शर्मा २५, स्नेह राना २०, ऋचा घोष ३५ धावांवर माघारी परतली. भारतीय संघाचा पहिला डाव २४७ धावांवर आटोपला.

***

### बाऊंड्री लाईनवर डाईव्ह मारत घेतला अविश्वसनीय कॅच

मुंबई –मॉडर्न डे क्रिकेटमध्ये न्युझीलंडचा संघ हा क्षेत्ररक्षणाच्या बाबतीत अव्वल स्थानी असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आधी भारत आणि ऑस्ट्रेलियाचे संघ क्षेत्ररक्षणाच्या बाबतीत पुढे होते. पण आता न्यूझीलंडच्या खेळाडूंनी एकापेक्षा एक भन्नाट कॅच पकडून क्षेत्ररक्षणाचा स्तर उंचावला आहे. भन्नाट कॅच घेण्याच्या बाबतीत ग्लेन फिलिप्स नेहमीच चर्चेत असतो. पण आता ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या सामन्यात मार्क चॅपमनने सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करताना डाईव्ह मारून भन्नाट कॅच घेतला आहे. ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. मार्क चॅपमनने ऑस्ट्रेलियाच्या अ‍ॅलेक्स कॅरीला बाद करण्यासाठी हा कॅच घेतला. तर झाले असे की, न्यूझीलंडची गोलंदाजी असताना न्यूझीलंडकडून ९ वे षटक टाकण्यासाठी जिमी निशम गोलंदाजीला आला. या षटकातील पाहिल्याच चेंडूवर त्याने टीम डेव्हिडला बाद करत माघारी धाडले. पहिल्याच चेंडूवर विकेट पडल्याने ऑस्ट्रेलियाचा संघ दबावात होता. त्यामुळे दबाव कमी करण्यासाठी अ‍ॅलेक्स कॅरीने पहिल्याच चेंडूवर मोठा फटका मारला. हा चेंडू सीमारेषेपार गेलाच होता, इतक्यात मार्क चॅपमनने डाईव्ह मारली आणि भन्नाट कॅच घेतला.

# भारताच्या लेकींचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

## सामन्यानंतर थेट ड्रेसिंग रूममध्ये पोहोचली टीम इंडिया; पाकिस्तानकडे दुर्लक्ष

▶पाकिस्तानपुढे २४८ धावांचे आव्हान ▶ हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा ▶ ८८ धावांनी भारताचा मोठा विजय

**कोलंबो :**भारताच्या महिला संघाने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवत १२–० चा विक्रम कायम ठेवला आहे.भारतीय महिला संघाने पाकिस्तानला आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक सामन्यात दणदणीत विजय मिळवला आहे. टीम इंडियाने वर्ल्डकपमध्ये सलग दुसरा विजय नोंदवला. पाकिस्तान संघाला १५९ धावांवर सर्वबाद केलं आणि शानदार विजय मिळवला. श्रीलंकेला पराभूत केल्यानंतर, भारताने आता पाकिस्तानला पराभूत करून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. या विजयासह, भारताने सलग १२ व्यांदा पाकिस्तानला पराभूत करून आपला विक्रम कायम ठेवला आहे. यासह, विश्वचषकात पाकिस्तान महिला संघावर सलग पाचवा विजय मिळवला आहे.




भारतीय संघाने पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर हरमनसह संपूर्ण संघ थेट ड्रेसिंग रूमच्या दिशेने निघाला. यासह आशिया चषकातील सामन्यांप्रमाणे महिला विश्वचषकातही भारताच्या महिला संघाने पाकिस्तानी संघातील खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही. तर नाणेफेकीदरम्यानही हरमनप्रीत कौरने फातिमा सनाशी हस्तांदोलन केलं नाही, ना नजरानजर झाली. नाणेफेक गमावल्यानंतर, टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ५० षटकांत २४७ धावांवर गारद झाला. टीम इंडियाकडून हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा केल्या. २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानी महिला संघ ४३ षटकांत १५९ धावांवर सर्वबाद झाला आणि टीम इंडियाने पाकिस्तानवर शानदार विजय मिळवला. टीम इंडियाकडून क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. सामन्यादरम्यान मैदानावर प्रचंड प्रमाणात कीटक आल्याने अक्षरश: सामना काही वेळ थांबवण्यात आला होता, जेणेकरून मैदानावर स्प्रे करता येईल.

भारताने दिलेल्या २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात खूपच खराब झाली आणि २६ धावांत त्यांनी तीन विकेट गमावल्या. यानंतर, सिद्रा अमीनने एका टोकाला पाय घट्ट रोवून ठेवत संघाचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला पण दुसऱ्या टोकाकडून नियमित अंतराने विकेट पडत राहिल्या. या सामन्यात सिद्रा अमीनने १०६ चेंडूत ८१ धावा केल्या. दरम्यान, आठ पाकिस्तानी खेळाडूंना डावात दुहेरी आकडा गाठता आला नाही.टीम इंडियाकडून क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा या सर्वात यशस्वी फलंदाज ठरल्या. क्रांतीने तिच्या १० षटकांमध्ये फक्त २० धावा देत तीन विकेट घेतल्या. तर दीप्तीने ९ षटकांत ४५ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर स्नेह राणाने १ विकेट घेतली.

## अभिषेक शर्मा पुन्हा फ्लॉप, तिलक वर्मा अपयशी

कानपूर–भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ यांच्यातील तिसऱ्या अनौपचारिक सामन्यात अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा अपयशी ठरले आहेत. पंजाब किंग्जकडून खेळणाऱ्या प्रभसिमरन सिह यानं तुफानी शतक केलं आहे. हा सामना कानपूरच्या ग्रीन पार्कमध्ये सुरु आहे. ऑस्ट्रेलियानं पहिल्यांदा फलंदाजी करताना ३१६ धावा केल्या. भारताला विजयासाठी ३१७ धावांची गरज आहे. अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा मोठी खेळी करण्यात अपयशी ठरल्यानंतर प्रभसिमरन सिंह यानं ६८ बॉलमध्ये १०२ धावांची खेळी केली यामुळे भारत भक्कम स्थितीत पोहोचला. भारताने हा सामना २ विकेटनं जिंकला आहे.

ऑस्ट्रेलियाच्या संघानं सुरुवातीला १३५ धावांवर ६ विकेट गमावल्या होत्या. मात्र, कॅप्टन जॅक एडवर्डस आणि लियाम स्कॉटने १५२ धावांची भागीदारी केली. एडवर्डसने ८९ आणि स्कॉटने ७३ धावा केल्या. यामुळे ऑस्ट्रेलियाने ३१६ धावांपर्यंत मजल मारली.

अभिषेक शर्मा, तिलक वर्मा अपयशी


अभिषेक शर्मा दुसऱ्या वनडे मध्ये शुन्यावर बाद झाला होता. तिसऱ्या मॅचमध्ये तो केवळ २२ धावा करु शकला. तिलक वर्मानं दुसऱ्या वनडेमध्ये ९४ धावा केल्या होत्या. तिसऱ्या आणि निर्णायक सामन्यात तो ३ धावा करुन बाद झाला. प्रभसिमरन सिंहने एकाबाजूने आक्रमक फलंदाजी सुरु ठेवली. त्याने ६८ बॉलमध्ये १०२ धावा केल्या. या खेळीत त्याने ८ चौकार आणि ७ षटकार मारले. प्रभसिमरन सिंह यानं १५० च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या.

या मालिकेत शतक करणारा प्रभसिमरन भारताचा तिसरा खेळाडू ठरला आहे. पहिल्या वनडेत श्रेयस अय्यर आणि प्रियांश आर्यने शतक केलं होतं.

## हरमनप्रीतने आधी जागा दाखवली, मग सूर्याने पाकिस्तानची उरली सुरली इज्जत काढली

मुंबई–आयसीसीच्या वुमेन्स वर्ल्डकप स्पर्धेत आज भारतीय महिलांचा संघ आणि पाकिस्तानी महिलांचा संघ आमने सामने आला आहे. या सामन्याला सूरूवात झाली आहे.आणि या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने पाकिस्तानच्या फातिमा सनासोबत हॅडशेक टाळत पाकिस्तानला त्यांची जागा दाखवली आहे.त्यानंतर भारताचा टी२० कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानची उरली सूरली इज्जत काढली आहे.त्यामुळे सूर्या नेमकं काय म्हणाला आहे? हे जाणून घेऊयात.

भारत आणि पाकिस्तान सामन्याआधी सूर्यकुमार यादव एका शोवर म्हणाला की, मी पुन्हा एकदा सांगेन की स्पर्धा म्हणजे जेव्हा सामना एकमेकांशी असतो. ११–० ही स्पर्धा नसते. जर आपल्या महिला संघाने चांगले क्रिकेट खेळण्यावर लक्ष केंद्रित केले तर ते १२–० असेल, असा सल्ला दिला आहे. त्यामुळे सूर्याने पुन्हा एकदा पाकिस्तानची अब्रू काढली आहे.



**मैदानात राडा**

भारताच्या महिलांनी पाकिस्तानविरुद्ध कधीही एकदिवसीय सामना गमावलेला नाही, त्यांनी हेड–टू–हेड ११–० असा आघाडी घेतला आहे. प्रथम फलंदाजी करणाऱ्या सामन्यांमध्ये, त्यांचा सरासरी विजयी फरक १३८ धावांचा आहे, तर पाठलाग करणाऱ्या सामन्यांमध्ये, त्यांनी सरासरी आठ विकेट्सने आणि २६ षटके शिल्लक असताना विजय मिळवला आहे. महिला विश्वचषक स्पर्धेत भारताचा विक्रम ४–० असा आहे.दरम्यान भारताने आशिया कपमध्ये पाकिस्तानचा तीनदा पराभव केला होता. फायनल सामन्यात हेच कट्टर प्रतिस्पर्धी सामने आले होते.त्यामुळे भारताने ६ विकेटस राखून पाकिस्तानवर विजय मिळवला होता. या स्पर्धेनंतर सूर्यकुमार यादवने थेट पाकिस्तानला उद्देशून म्हटले की ''प्रतिस्पर्धा'' हा शब्द आता लागू होत नाही. त्यामुळे ''तुम्ही लोकांनी भारत–पाकिस्तानमधील प्रतिस्पर्ध्याबद्दल प्रश्न विचारणे थांबवावे. माझ्या मते, जर दोन संघ १५–२० सामने खेळले आणि जर ते बरोबरीत आले तर ते प्रतिस्पर्धी आहे. १०–०, १०–१ मला आकडेवारी माहित नाही, परंतु ही आता प्रतिस्पर्धी नाही. तसेच मला वाटते की आम्ही त्यांच्या (पाकिस्तान) पेक्षा चांगले क्रिकेट खेळलो, आणि गोलंदाजीच्या दृष्टिकोनातूनही,'' असे त्यांनी आशिया कप विजयानंतर पत्रकारांना सांगितले होते.टॉस दरम्यान भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने पाकिस्तानची कर्णधार फातिमा सानाशी हॅन्ड शेक करण्यास नकार दिला, ज्यामुळे ती स्तब्ध झाली.त्यामुळे पाकिस्तानला पुन्हा एकदा अपमान झाला आहे. तसेच टॉस वेळी पाकिस्तानची कर्णधार फातिमा साना हिने नाणेफेक जिंकली आणि ढगाळ वातावरणाचा हवाला देत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आम्ही प्रथम गोलंदाजी करणार आहोत, असे दिसते की विकेटवर थोडा ओलावा असू शकतो. आमच्यासाठी एक बदल – ओमैमा सोहेलची जागा सदाफ शमास. आमचा आत्मविश्वास उत्तम आहे, आशा आहे की आम्ही आज चांगले खेळू. २५० पेक्षा कमी धावसंख्येचा पाठलाग चांगला असू शकतो,'' सना म्हणाली.एका सक्तीच्या बदलानंतरही तिचा संघ लक्ष केंद्रित करून

## भारत-पाकिस्तान सामन्यावर मच्छरांचा अटॅक: १५ मिनिटे मैदानात नुसता धुरळा

मुंबई–भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात महिला वर्ल्ड कप २०२५ चा ६ वा सामना खेळवला जातोय. कोलंबोच्या स्टेडियमवर रविवार ५ ऑक्टोबरच्या दुपारी ३ वाजल्यापासून सामन्याला सुरुवात झाली. या सामन्याचा टॉस पाकिस्तानने जिंकून त्यांनी प्रथम गोलंदाजी निवडली. तेव्हा टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करून २४७ धावा केल्या. पाकिस्तानच्या गोलंदाजांना टीम इंडियाला ऑल आउट करण्यात यश आले. मात्र सामन्यादरम्यान मैदानात असे काही घडले जे पाहून सर्वच आश्चर्यचकित झाले. सध्या याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.आर. प्रेमदासा स्टेडियम कोलंबो येथे टीम इंडिया महिला वर्ल्ड कप २०२५ मधील दुसरा सामना पाकिस्तान विरुद्ध खेळतेय. पाकिस्तानने टॉस जिंकल्यामुळे टीम इंडिया आधी फलंदाजीसाठी मैदानात उतरली. फलंदाजी सुरु असताना अचानकपणे मैदानात मच्छरांनी हल्ला केला. मैदानात खूप मच्छर आले आणि खेळाडूंच्या डोक्यावर अवतीभवती भिरभिरू लागले. त्यामुळे खेळाडूंना सामना खेळताना अडचण येत होती. ही सर्व घटना ३४ व्या ओव्हरला घडली. त्यानंतर १५ मिनिटांचा ब्रेक घेण्यात आला.

मात्र याचा परिणाम सामन्यावर झाला नाही आणि ओव्हर्स कमी करण्यात आल्या नाहीत. खेळ थांबला तेव्हा भारताचा स्कोअर ३४ ओव्हर दरम्यान १५४ धावांवर ४ विकेट एवढा होता. जेमिमा रोड्रिग्स ३३ बॉलमध्ये २८ धावा करून नाबाद होती तर दीप्ति शर्मा २ धावा करून खेळत होती. नुकत्याच पार पडलेल्या पुरुषांच्या आशिया कप २०२५ स्पर्धेत भारत – पाकिस्तानच्या संघात तीन सामने खेळवण्यात आले. मात्र यापैकी एकाही सामन्यात टीम इंडियाने पाकिस्तानच्या खेळाडूंसह हात मिळवला नाही. टॉस दरम्यान सुद्धा सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधारशी हात मिळवला नव्हता. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर टीम इंडियाने हा निर्णय घेतला होता. भारतीय पुरुष क्रिकेट संघाने घेतलेली ही भूमिका भारताच्या महिला संघाने सुद्धा पाकिस्तान विरुद्ध वर्ल्ड कप सामन्यातही घेतली.

भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने टॉस झाल्यावर पाकिस्तानच्या कर्णधाराशी हात मिळवणं टाळलं. एवढंच नाही तर हरमनप्रीतने पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना सोबत नजर सुद्धा मिळवली नाही. भारतीय संघाची प्लेईंग ११ :प्रतिका रावल, स्मृती मानधना, हरलीन देओल, हरमनप्रीत कौर (कर्णधार), जेमिमाह रॉड्रिग्स, रिचा घोष (विकेटकीपर), दीप्ती शर्मा, स्नेह राणा, रेणुका सिंग ठाकूर, क्रांती गौड, श्री चरणी

पाकिस्तानची प्लेईंग ११ :मुनीबा अली, सदफ शमास, सिद्रा अमीन, रमीन शमीम, आलिया रियाझ, सिद्रा नवाज (विकेटकीपर), फातिमा सना (कर्णधार), नतालिया परवेझ, डायना बेग, नशरा संधू, सादिया इक्बाल.

## विदर्भाची इराणी चषकावर मोहोर, शेष भारतावर ९३ धावांनी मात; दुबेचा प्रभावी मारा



प्रत्येक वेळी रणजी करंडक जिंकल्यानंतर इराणी चषकावरही मोहोर उमटवण्याची मालिका विदर्भाने कायम राखली. यंदा जामठा येथे झालेल्या लढतीत विदर्भाच्या संघाने शेष भारताचा ९३ धावांनी पराभव करताना तिसऱ्यांदा इराणी चषकाचे जेतेपद पटकावले. डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबे आणि वेगवान गोलंदाज यश ठाकूर यांनी दोन्ही डावांत मिळून प्रत्येकी सहा गडी बाद करत विदर्भाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

विदर्भाने विजयासाठी शेष भारतासमोर ३६१ धावांचे आव्हान ठेवले होते. याचा पाठलाग करताना आघाडीचे फलंदाज अपयशी ठरल्यानंतर दिल्लीकर यश धूलने (११७ चेंडूंत ९२) प्रतिकार केला. त्याला सारांश जैन (३६ चेंडूंत २९) आणि मानव सुथार (११३ चेंडूंत ५६) यांची काही प्रमाणात साथही लाभली. त्यांच्या लढ्याने विदर्भाचा विजय लांबवला खरा, पण अखेरीस हर्ष दुबे (४/७३), आदित्य ठाकरे (२/२७) आणि यश ठाकूर (२/४७) यांच्या अप्रतिम गोलंदाजीसमोर शेष भारताचा दुसरा डाव २६७ धावांत संपुष्टात आला. विदर्भाने आतापर्यंत तीन वेळा रणजी करंडकाचे जेतेपद मिळवले असून त्यानंतर तीनही वेळा इराणी चषकही पटकावला आहे.

यंदाच्या लढतीत विदर्भाने पहिल्या दिवसापासूनच शेष भारताच्या संघावर वर्चस्व गाजवले. पहिल्या डावात अथर्व तायडेचे शतक आणि त्याला यश राठोडची मिळालेली साथ यामुळे विदर्भाला ३४२ धावांची मजल मारता आली. मग गोलंदाजांनी भरीव कामगिरी करताना शेष भारताला २१४ धावांत रोखले. विदर्भाने दुसऱ्या डावात २३२ धावा करत शेष भारतासमोर ३६१ धावांचे आव्हान ठेवले. मात्र, अभिमन्यू ईश्वरन (१७), इशान किशन (३५), कर्णधार रजत पाटीदार (१०) आणि ऋतुराज गायकवाड (७) या नामांकित फलंदाजांना आलेल्या अपयशामुळे अखेरीस शेष भारताला पराभव पत्करावा लागला.आता रणजी करंडकाच्या नव्या हंगामाला १५ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून विदर्भाची सलामीला तुलनेने दुबळ्या नागालँडशी गाठ पडेल.

संक्षिप्त धावफलक

विदर्भ (पहिला डाव) : ३४२

शेष भारत (पहिला डाव) : २१४

विदर्भ (दुसरा डाव) : २३२

शेष भारत (दुसरा डाव) : ७३.५ षटकांत सर्वबाद २६७ (यश धूल ९२, मानव सुथार नाबाद ५६, सारांश जैन २९; हर्ष दुबे ४/७३, आदित्य ठाकरे २/२७, यश ठाकूर २/४७) सामनावीर : अथर्व तायडे

# मध्य रेल्वे, मुंबई विभागाद्वारे सुरक्षा सेमिनारचे आयोजन

## प्रधान मुख्य इलेक्ट्रिकल इंजिनियर यांनी सुरक्षित रेल्वे संचालनाचे महत्त्व अधोरेखित केले

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वे, मुंबई विभागाच्या ट्रॅक्शन रोलिंग स्टॉक ऑपरेशन्स विभागाने ०३.१०.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथील सभागृहात सिग्नल पासिंग ट डेंजर (SPAD) प्रतिबंधनावरील संरक्षा सेमिनार आयोजित केला.

या कार्यक्रमाला श्री अनुप कुमार अग्रवाल, प्रधान मुख्य विद्युत अभियंता (PCEE); श्री चंद्र किशोर प्रसाद प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी (PCSO) आणि श्री हिरेश मिना, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM), मध्य रेल्वे, मुंबई विभाग उपस्थित होते. मुख्यालय आणि मुंबई विभागातील वरिष्ठ अधिकारी देखील या चर्चासत्रात उपस्थित होते.

सुमारे ३०० कर्मचारी आणि विभागीय मुख्य लोको निरीक्षकांनी संरक्षा चर्चासत्रात भाग घेतला. सिग्नल पासिंग ट डेंजर (SPAD) रोखण्यासाठी सुरक्षित ट्रेनचे कामकाज सुनिश्चित करण्यासाठी आणि अपघात तथा असामान्य घटना घडल्यास धोक्याच्या वेळी करावयाच्या कारवाईसाठी धावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या भूमिकेचे महत्त्व यावर चर्चासत्राचा भर होता.

कार्यक्रमात भाष्य करताना, श्री अनूप कुमार अग्रवाल, प्रधान मुख्य विद्युत अभियंता यांनी सुरक्षित रेल्वे संचालनाचे महत्त्व, व्यावसायिक व व्यक्तिगत शिस्त, सिग्नल लोकेशन अनाउंसमेंट सिस्टीम (SILAS), फॉग सेफ डिव्हाइस (FSD) यांचे महत्त्व, तसेच कर्मचारी वर्गासाठी प्रशासनाकडून सुधारित सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनावर भर दिला.

श्री चंद्रकिशोर प्रसाद, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी यांनी सिग्नल्सवर लक्ष देण्यासाठी फिंगर पॉइंटिंग आणि कॉलिंग तंत्राच्या महत्त्वावर भर दिला.

श्री हिरेश मीना, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मुंबई विभाग, यांनी रनींग कर्मचार्यांच्या सुरक्षित रेल्वे संचालनातील भूमिकेवर अभिमान असल्याचे उद्बोधित केले आणि मिशन झिरो SPAD वर विशेष लक्ष केंद्रित केले.

श्री संजय सिंह, मुख्य विद्युत अभियंता (ऑपरेशन) यांनी प्रतिबंधात्मक उपाय, स्पॅड रोखण्यासाठी आरएस फ्लॅप व्हॉल्व्ह ऑपरेशन आणि सिग्नल पैलूंनुसार लक्षपूर्वक वेग राखण्याची गरज यावर भाष्य केले. मुंबई विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ऑपरेशन/संरक्षा) श्री एम. एल. विष्णोई यांनी ड्युटीपूर्वी पुरेशी विश्रांती घेण्याची गरज यावर लक्ष केंद्रित केले आणि एक संवादात्मक प्रश्नोत्तर सत्र देखील आयोजित केले. श्री सतीश अंबोरे, कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी यांनी स्पॅडच्या मानसिक दृष्टिकोनावर आणि क्रूशी संबंधित जागतिक सुरक्षा पद्धतींवर मौल्यवान अंतर्दृष्टी सामायिक केली.

सेमिनारने सहभागींना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुभवातून शिकण्याची आणि त्यांच्या मार्गदर्शनातून ज्ञान मिळवण्याची परस्पर संवादात्मक संधी मिळाली तसेच सुरक्षित रेल्वे संचालनाचे महत्त्व व प्रश्नोत्तरे सत्राद्वारे येणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचा समारोप श्री शिखर श्रीवास्तव, विभागीय विद्युत अभियंता (TRO), यांच्या आभार प्रस्तावाने झाला, ज्यांनी TRSO विभागातील अधिकारी आणि रनींग कर्मचार्यांप्रती आपले मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

या उपक्रमातून मुंबई विभागाची सुरक्षितता आणि ऑपरेशनल उत्कृष्टतेची संस्कृती वाढवण्याची सततची वचनबद्धता अधोरेखित झाली, ज्याचा उद्देश जोखीम कमी करणे आणि रेल्वे ऑपरेशन्समध्ये सर्वोच्च मानके सुनिश्चित करणे आहे.

स्वच्छ पर्यावरणासाठी मध्य रेल्वेचे योगदान

संरक्षित रेल्वे वाहतूक सुनिश्चित करण्याव्यतिरिक्त, मध्य रेल्वे स्वच्छता पखवाडा -२०२५- विशेष मोहीम ५.० अंतर्गत स्वच्छता उपक्रम आयोजित करून आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांवर देखील लक्ष केंद्रित करत आहे.



विशेष मोहीम ५.० (२-३१ ऑक्टोबर २०२५) चा भाग म्हणून, मध्य रेल्वे स्वच्छता आणि ई-कचऱ्याची पद्धतशीर विल्हेवाट यावर लक्ष केंद्रित करणारे उपक्रम राबवत आहे. या मोहिमेत संपूर्ण स्वच्छता, सुधारित जागा व्यवस्थापन, कामाच्या ठिकाणांचे सौंदर्यीकरण, पर्यावरणपूरक उपक्रम, हरित पद्धती आणि नेटवर्कमध्ये डिजिटायझेशन यावरही भर देण्यात आला आहे. सार्वजनिक सहभाग, स्थानकांवर नागरिकांच्या अभिप्रायाचा समावेश करणे आणि अनावश्यक साहित्य आणि भंगाराची विल्हेवाट लावून जास्तीत जास्त महसूल मिळवण्यावर विशेष लक्ष दिले जात आहे, ज्यामुळे संपूर्ण रेल्वेमध्ये स्वच्छता आणि आधुनिक व्यवस्थापन मानके संस्थात्मक बनत आहेत.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कलबुरगि आणि शहाबाद स्थानकांवर बीदर-बेंगलूरू छावनी विशेष गाड्या थांबतील

**सोलापूर /प्रतिनिधी :** रेल्वे बीदर आणि बेंगलूरू छावनी दरम्यान विशेष रेल्वे सेवा चालवणार आहे. या विशेष गाड्या मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कलबुरगि आणि शहाबाद या दोन स्थानकांवर थांबतील.

बीदर - बेंगलुरू छावनी विशेष

- ०७०६३ विशेष गाड्या ०४.१०.२०२५ रोजी दुपारी २:४० वाजता बीदरहून निघतील आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०५:०० वाजता बेंगळुरू छावनी येथे पोहोचतील.
- ०७०६४ विशेष गाड्या ०५.१०.२०२५ रोजी रात्री १०:३० वाजता बेंगळुरू छावनी येथून निघतील आणि दुसऱ्या दिवशी दुपारी २:४० वाजता बीदर येथे पोहोचतील.

थांबे: हुमनाबाद, कमलापुर, कलबुरगि, शहाबाद, यादगिर, रायचूर, मंत्रालयम रोड, अदोनी, गुंतकल, अनंतपुर, धर्मवरम और येलहंका.

रचना: १ एसी-२ टियर, २ एसी-३ टियर, १७ स्लीपर क्लास, २ जनरल सेकंड क्लास आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन. (२४ कोच)

आरक्षण आणि बुकिंग: ०७०६३/०७०६४ या विशेष गाड्यांसाठी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर विशेष शुल्क आकारले जाऊ शकते.

अनारक्षित कोचसाठी बुकिंग स्टेशनवरील बुकिंग काउंटर आणि UTS ॲपद्वारे देखील करता येते.

प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती केली जाते.

या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## रास गरबा उत्सवास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** एमआयटी वर्ल्ड पीस स्कुल, गलक्सी गॅलॅक्सी डान्स अकॅडमी आणि रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रास गरबा उत्सवास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे , सचिव डॉ.नेताजी शिंगटे, प्रोजेक्ट चेअरमन विजय धाकपाडे, रवींद्र चामले , गिरीश ब्याळे , वर्ल्डपीस स्कूल लातूरचे प्रिन्सिपल मनोज सावळे, वर्ल्डपीस स्कूल लातूरचे एडमिन मॅनेजर संगमेश बेंबळगे, सुदर्शन कांबळे , हेमंत रामढवे, पुष्पराज खुबा, उद्धव बडगिरे, मेघराज बरबडे, गारठे गिरीश, विनय जाजू , नंदकिशोर लोया, धवल मशरू, नागेश स्वामी ,भालचंद्र थळकरी,मन्मथ पोपडे, रोहन मुंददा, जगन्नाथ मामडगे, साहेबराव मोरे, जितेंद्र कोरे, बाबूशा माळी, मुकुंद तांभाळकर, महेश बांगर, ऋषिकेश लोया,स्नेहा लोया , सोनाली सौदागर , सुंदर पाटील, निलेश राजमाने, पत्रकार शशिकांत पाटील, गिरीश देशपांडे, दीपक पदमपल्ले , अंजली कांदे ,विपुल हाके ,राहुल चावरे, मदन केंद्रे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. नवरात्री - दसऱ्याचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या रास गरबा उत्सवास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. महिला - भगिनींनी रास गरब्याचा आनंद लुटला.

## लातूरच्या ऑइल कंपनीत भीषण आग

**लातूर/प्रतिनिधी:**शहरातील जुन्या एमआयडीसीतील मराठवाडा ऑइल केमिकल कंपनीत भीषण आग लागल्याची घटना शुक्रवारी (दि.३) दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. कंपनीत मजुर काम करत असताना ही आग लागल्यामुळे अग्निशमन विभागास याची कल्पना देण्यात आली. माहिती मिळताच पुढील तीन मिनीटात अग्निशमन विभागाच्या ६ बंबांच्या मदतीने दोन तासात आगिवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. यात कसलीही जिवीत हानी झालेली नसली तरी लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. शहरातील जुन्या एमआयडीसी परिसरातील कळंब रोडवर असलेल्या मराठवाडा ऑइल केमिकल कंपनी आहे. दुपारी सुमारे ११.५५ वाजता कंपनीच्या रिक्टर विभागातून अचानक धूर आणि आगीचे लोट उसळले. यावेळी कंपनीत कामगार काम करत होते. त्यानंतर कंपनीचे मालक उदय कुलकर्णी यांनी तातडीने अग्निशमन विभागाला याची माहिती दिली.

अग्निशमन दलाच्या दक्षतेमुळे मोठी दुर्घटना टळली. कॉल मिळताच केवळ तीन मिनिटांतच एमआयडीसी अग्निशमन विभागातील तब्बल ६ बंब घटनास्थळी दाखल झाले. ज्वलनशील रसायनांमुळे आगीचा फैलाव जलद गतीने होत असला तरी, जवानांनी योग्य ती खबरदारी घेऊन दिड ते दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. आगीत कंपनीतील मोठ्या प्रमाणात साहित्य, यंत्रसामग्री व तयार उत्पादन जळून खाक झाले.

## शरदचंद्रजी पवार उर्दू शाळेत महात्मा गांधी जयंती साजरी




**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा शहरातील शरदचंद्रजी पवार उर्दू प्राथमिक शाळेमध्ये महात्मा गांधीजी यांची जयंती साजरी करण्यात आली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सत्य,अहिंसा ही दिलेली शिक्षणव जगण्याचा मार्ग यावर शाळेचे मुख्याध्यापका ए एस रिझवी यांनी आपले मनोगत व्यक्त करत जीवनावर प्रकाश टाकले

यावेळी संस्था अध्यक्ष साजिद खडके, मुख्याध्यापिका ए.एस. रिजवी खडके, जावेद मुजावर, अखिल शेख, वहिदा शेख, सबिया मोमीन ,शहीन फरूखी,अंजुम शेख सह संस्थेची कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## हाडग्यात पुरग्रस्त शेतकऱ्याची आत्महत्या

**निलंगा/आयुब बागवान :** ओढ्या काठच्या जमीनीत पुराचे पाणी शिरुन संपूर्ण खरीप हंगामातील पिकाची नासाडी झाल्याने आर्थिक विवंचनेतून तालुक्यातील हाडगा येथील शेतकरी मधूकर सोपान वाघमारे या शेतकऱ्याने विषप्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना शनिवार (दि ४) रोजी सकाळी नऊ वाजता घडली.समजलेली माहिती अशी की, निलंगा तालुक्यातील हाडगा अल्पभूधारक शेतकरी मधूकर सोपान वाघमारे वय ६५ वर्ष यांची गावच्या शेजारीच ओढ्याच्या काठावर जमीन असून मागच्या एक महिन्यापासून सततच्या मुसळधार पावसाने त्यांच्या शेतात पाणी शिरुन खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले. लागवडीचा खर्चही निघणार नसल्याने आर्थिक विवंचनेत ते मागच्या आठ दिवसापासून बेचैन झाले होते. त्यातच त्यांनी शनिवारी सकाळी नऊ वाजता स्वतःच्या घरात विष प्राशन केले. तात्काळ त्यांना निलंगा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली होती. शवविच्छेदनानंतर सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. घटनेची माहिती तंटामुक्ती अध्यक्ष धनाजी वाघमारे यांनी महसूल व पोलीस प्रशासनाला दिली. याबाबत निलंगा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. तर सदरील मयताच्या कुटुंबाला सरकारच्या वतीने नियमानुसार आर्थिक मदत मिळवून देऊ असे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले...



# दिवाळी उत्सवानिमित्त २०२५ साठी रेल्वे ३० अतिरिक्त विशेष गाड्या चालवणार

## पुणे - दानापूर - सुपौल एक्सप्रेस बदललेल्या गाडी क्रमांकांसह धावणार

**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या दिवाळी उत्सवानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे ३० अतिरिक्त विशेष गाड्या चालवणार. तपशील पुढीलप्रमाणे :

१) लोकमान्य टिळक टर्मिनस - मडगाव - लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (६ सेवा)

०११४५ साप्ताहिक विशेष गाडी सोमवार दि. ६.१०.२०२५, १३.१०.२०२५ व २०.१०.२०२५ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ०८.२० वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी २२.४० वाजता पोहोचेल. (३ सेवा) ०१००४ साप्ताहिक विशेष गाडी रविवार दि. ५.१०.२०२५, १२.१०.२०२५ व १९.१०.२०२५ रोजी मडगाव येथून १६.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे ०६.२० वाजता पोहोचेल. (३ सेवा)

थांबे: ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेर्डी, चिपळूण, संगमेश्र्वर रोड, रत्नागिरी, अदावली, वीलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थीवी आणि करमळी.

संरचना: एक वातानुकूलित द्वितीय, तीन वातानुकूलित तृतीय, दोन वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय वर्ग, १ द्वितीय आसन व्यवस्थेसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅन.

आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०१००३ साठी आरक्षण ०४.१०.२०२५ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in या संकेतस्थळावर खुले होईल.

२) पनवेल - चिपळूण - पनवेल अनारक्षित विशेष (२४ सेवा)

०११५९ अनारक्षित विशेष गाडी ०३.१०.२०२५ ते २६.१०.२०२५ पर्यंत प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवार रोजी पनवेल येथून १६.४० वाजता सुटेल आणि चिपळूण येथे त्याच दिवशी २१.५५ वाजता पोहोचेल.

०११६० अनारक्षित विशेष गाडी ०३.१०.२०२५ ते २६.१०.२०२५ पर्यंत प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवार रोजी चिपळूण येथून ११.०५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

थांबे: सोमाटणे, आपटा, जीते, पेन, कसु, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कलांबणी बु.दु., खेर्डी आणि अंजनी.

संरचना: ८ मेमू डबे.

प्रवाशांना विनंती आहे की, वरील गाड्या अनारक्षित असतील आणि त्यासाठी तिकिटे यूटीएस प्रणालीद्वारे बुक करता येतील, ज्या तिकिटांसाठी



सामान्य सुपरफास्ट मेल/एक्सप्रेस गाड्यांसारखे शुल्क लागू होईल.

विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रवाशांना विनंती आहे की, या विशेष गाड्या वापराव्यात आणि प्रवासाचा लाभ घ्यावा.

पुणे - दानापूर - सुपौल एक्सप्रेस बदललेल्या गाडी क्रमांकांसह धावणार, क्रमांक पुढीलप्रमाणे:

गाडी क्रमांक १२१४९ पुणे - दानापूर - सुपौल एक्सप्रेस आता नवीन गाडी क्रमांक ११४०१ यासह ०४.१२.२०२५ पासून धावणार आहे. गाडी क्रमांक १२१५० सुपौल - दानापूर - पुणे एक्सप्रेस आता नवीन गाडी क्रमांक ११४०२ यासह ०४.१२.२०२५ पासून धावणार आहे.

प्रवाशांना कृपया या बदलाची नोंद घ्यावी.

## अतिवृष्टीग्रस्त भागातील शेतमजुरांनाही शासनाने आर्थिक मदत करावी; युवा भिम सेनेची मागणी

**निलंगा/प्रतिनिधी :** मागील काळात महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेती कामावर शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या शेतमजुरांवर ही आता उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्या सोबतच शेतमजुरांनाही सरकारने दिवाळीपूर्वी प्रत्येक परिवारास दहा हजार रुपयाची आर्थिक मदत करावी अशी मागणी युवा भीमसेनेचे तालुका अध्यक्ष धनराज कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दिलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, मे २०२५ पासून आजतागायत सतत चालू असलेल्या पावसामुळे शेतमजुरांच्या हाताला काम नाही त्यामुळे शेतमजूर घरी बसून हलाखीचे जीवन जगत आहे. पावसामुळे शेतमजुरावर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसोबत शेतमजुरांनाही तात्काळ दहा हजार रुपयाची आर्थिक मदत करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर युवा भीमसेनेचे तालुकाध्यक्ष धनराज कांबळे (अंबुलगेकर) यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# मध्य रेल्वेच्या आरपीएफ, भुसावळ विभागाने दाखवली उल्लेखनीय तपास कामगिरी

## फक्त ७२ तासांत चोरीचा गुन्हा उघडकीस आणून चोरलेला माल परत मिळवला





**मुंबई/प्रतिनिधी :** तपासातील उल्लेखनीय प्रावीण्य आणि तांत्रिक कौशल्याचे उत्तम प्रदर्शन करत, मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने (RPF) सोन्याच्या दागिन्यांच्या रु १.८२ कोटींच्या बनावट दरोडा प्रकरण यशस्वीरित्या उघड केले आहे. सुरुवातीला मोठ्या दरोड्याप्रमाणे नोंदवले गेलेले हे प्रकरण सखोल तपासानंतर काळजीपूर्वक आखलेली बनावट चोरी असल्याचे उघड झाले. या प्रकरणातील संपूर्ण मालमत्ता केवळ ७२ तासांत परत मिळवण्यात आली असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दि. ३०.०९.२०२५ रोजी गाडी क्रमांक १२१८७ जबलपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस गरीब रथ एक्सप्रेसमध्ये चोरीची घटना घडल्याची नोंद करण्यात आली. श्री. सागर पारेख यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथील शासकीय रेल्वे पोलिस (जीआरपी) ठाण्यात गुन्हा क्रमांक ०८२/२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३(५) आणि ३०९(६) नुसार तक्रार नोंदवली. त्यांनी आपल्या तक्रारीत ५२ सोन्याच्या बांगड्या आणि ३५ सोन्याच्या अंगठ्या, एकूण १.५ किलोग्रॅम वजनाच्या आणि किंमत रु १,८२,००,०००/- इतक्या असलेल्या दागिन्यांची चोरी झाल्याचे नमूद केले.

तपासाअंती हे स्पष्ट झाले की, घटना घडलेले ठिकाण जीआरपी पोस्ट खंडवा यांच्या कार्यक्षेत्रात येते, त्यामुळे प्रकरण त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले.

त्यानुसार, हे प्रकरण दि. ३.१०.२०२५ रोजी जीआरपी खंडवा यांनी त्याच कलमांखाली गुन्हा क्रमांक २१९/२०२५ म्हणून पुन्हा नोंदवले आणि भुसावळ आरपीएफची मदत मागवण्यात आली.

वरिष्ठ विभागीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीएफ पोस्ट खंडवा, गुन्हे गुप्तवार्ता शाखा आणि आरपीएफ भुसावळ येथील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक संयुक्त तपास पथकाची स्थापना करण्यात आली.

सीसीटीव्ही फुटेज विश्लेषण, डिजिटल ट्रॅकिंग, मोबाईल कॉल डेटा रेकॉर्ड (सीडीआर) आणि मार्ग नकाशांकन यांसारख्या आधुनिक तपास साधनांचा प्रभावी वापर करून पथकाने घटनेचे सखोल तांत्रिक विश्लेषण केले. तपासातून उघड झाले की कथित दरोडा पूर्णपणे बनावट असून तो फिर्यादीने आपल्या काही साथीदारांच्या मदतीने अधिकाऱ्यांना दिशाभूल करून खोटा तोटा दाखविण्याच्या उद्देशाने आखला होता.

चौकशीदरम्यान आरोपींनी कबुली दिली की त्यांनी खोट्या कथेला विश्वसनीयता देण्यासाठी स्वतःला जाणूनबुजून दुखापत केली होती. त्यांनी ही घटना बनावट असल्याचे मान्य करत सांगितले की सोन्याचे दागिने त्यांनी आपल्या साथीदार प्रवीण या व्यक्तीकडे कल्याण रेल्वे स्थानकावर सुपूर्द केले होते. या माहितीच्या आधारे आरपीएफ पथकाने तत्काळ कारवाई करत प्रवीणला आरपीएफ पोस्ट खंडवा येथे बोलावले, जिथे तो ०४.१०.२०२५ रोजी संपूर्ण मालमत्तेसह हजर झाला. जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेमध्ये ५२ सोन्याच्या बांगड्या आणि ३५ सोन्याच्या अंगठ्या असून त्यांचे एकूण वजन १.६ किलो आणि किंमत सुमारे रु १.८२ कोटी इतकी आहे. संपूर्ण मालमत्ता कायदेशीर नोंदीसह जप्त करण्यात आली.

या प्रकरणातील चार आरोपी हे आहेत:

१. सागर पारेख (वय ४०), राहणार नाशिक, महाराष्ट्र; झवेरी बाजार, मुंबई येथील R.B. Jewellers Gold Ltd. LLP मध्ये भागीदार.

२. संजय कुमार (वय २७), राहणार पाली जिल्हा, राजस्थान; सध्या राहणार मुंबई.

३. प्रवीण कुमार (वय ३५), राहणार सिरोही जिल्हा, राजस्थान; सध्या राहणार दिवा ईस्ट, ठाणे.

४. राकेश जैन (वय ५३), राहणार मलबार हिल्स, मुंबई.

सर्व चार आरोपींना गुन्हा क्रमांक २१९/२०२५, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३(५) आणि ३०९(६) अंतर्गत अटक करण्यात आली असून सध्या भुसावळ विभाग, आरपीएफचे निरीक्षक प्रकाश चंद्र सेन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास चालू आहे.

भुसावळ व खंडवा आरपीएफ पथकांनी जीआरपीसोबत मिळून बनावट दरोड्याचा वेगवान उलगडा करून संपूर्ण मालमत्तेची पुनर्प्राप्ती करत उत्कृष्ट तपास कौशल्य, तीक्ष्ण गुप्तवार्ता विश्लेषण, देखरेखीच्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि समन्वित टीमवर्क याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे.

हे प्रकरण भुसावळ आरपीएफ विभागाच्या व्यावसायिकता, प्रामाणिकपणा आणि तांत्रिक कौशल्याचे साक्षीदार ठरते. तात्काळ कारवाईमुळे केवळ मोठा आर्थिक तोटा टाळण्यात आला नाही, तर उच्च-मूल्य प्रकरणे अचूकता आणि कार्यक्षमतेने हाताळण्यात रेल्वे सुरक्षा दलाची विश्वासार्हता देखील टिकवून ठेवली गेली.

# आटोळा नगरीमध्ये ६९ वा धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा



**नळेगाव/अजगर मजकुरी :** दिनांक २ ऑक्टोबर २०२५ वार गुरुवार या दिवशी मौजे आटोळा नगरीमध्ये ६९ वा धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा करण्यात आला व तसेच तक्षशिला बुद्ध विहार भूमिपूजन सोहळा संपन्न झाला यावेळी गावातील नागरिक व बौद्ध वाड्यातीलउपासक व उपाशीका उपस्थित होते सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला यावेळी बौद्ध विहार ट्रस्टचे अध्यक्ष सन्माननीय सचिन संतोष कांबळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन नियोजन केले या कार्यक्रमासाठी आटोळा गावचे सुपुत्र तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सन्माननीय सिद्धेश्वर जी लोहारे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले व तसेच गावातील प्रतिष्ठित उपसरपंच सन्माननीय सोमनाथ गणपती कलवले यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन केले य यावेळी गावातील मंडळी यात संतोष सोपान कलवले विश्वनाथ देविदास कलवले काशिनाथ देविदास कलवले आयुष्यमान मनोहर मनोहर धोंडीबा कांबळे शिवाजी गोपीनाथ कांबळे विकास व्यंकटी कांबळे गोपाळ शिवाजी कांबळे तुकाराम श्रीहरी कांबळे संभाजी गोपीनाथ कांबळे श्रीकांत मोहन कांबळे निवृत्ती मल्हारी कांबळे भगवान नर्सिंग कांबळे आधी समाज बांधव व महिला मंडळ उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी त्या संपन्न केला या कार्यक्रमाचे रिकामी सूत्रसंचालन सचिन संतोष कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन विकास व्यंकटी कांबळे यांनी केले

# मनपा शाळांचे विद्यार्थी दिल्लीच्या शैक्षणिक सहलीवर



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या विविध शाळातील विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी रविवारी (दि. ५)दिल्लीला रवाना झाले. राष्ट्रपती भवन, लाल किल्ला, इंडिया गेट, राष्ट्रीय संग्रहालय, संसद भवन आदी स्थळांना हे विद्यार्थी भेटी देणार आहेत. दि.१० ऑक्टोबर रोजी विद्यार्थी लातूर येथे परत येणार आहेत. दरम्यान रेल्वेचा आरामदायक प्रवासही विद्यार्थ्यांना अनुभवता येणार आहे.



सहल हे शिक्षणाचे माध्यम आहे. पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष डोळ्यांनी विविध स्थळे पाहून त्यांचा इतिहास व वारसा समजून घेण्यासाठी सहलींचे आयोजन केले जाते. या सहलीतून विद्यार्थ्यांना नागरिकशास्त्र, इतिहास आणि भारताची संस्कृती या संदर्भातील ज्ञानात भर पडणार आहे. मनपा शाळातील ५२ विद्यार्थी या सहलीत सहभागी झाले असून १० शिक्षक आणि मार्गदर्शकही त्यांच्या समवेत आहेत. मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी महानगरपालिकेच्या प्रांगणातून विद्यार्थ्यांच्या बसला हिरवा झेंडा दाखवला.उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांची यावेळी उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना सहलीसाठी शुभेच्छा देताना आयुक्त श्रीमती मानसी म्हणाल्या की, दिल्ली ही केवळ देशाची राजधानी नाही तर ते भारताच्या समृद्ध इतिहासाचे आणि लोकशाहीचे प्रतीक आहे. या सहलीतून तुम्हाला पुस्तकातील ज्ञान प्रत्यक्ष अनुभवता येईल, असेही त्या म्हणाल्या.

मनपाच्या शिक्षणाधिकारी आणि सहल प्रमुख श्रीमती श्वेता नागणे यांनी सांगितले की, प्रवासात विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शिस्तीला सर्वोच्च प्राधान्य आहे. ही सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि अविस्मरणीय ठरेल, असेही त्या म्हणाल्या.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

## खोकला ..

कफसिरपची भेसळ
लागला नव खोकला
दोष आहे रे कुणाचा
एक दुजांवरी ढकला

होते कशी का भेसळ
समोर आणा दाखला
ढोस द्यायचा यंत्रणेस
डोस चवीने चाखला

शोधूनि काढा कंटका
कोण पापांने माखला
दिसतनाही डोळ्यांना
रेडा रुतलेला चिखला

अशक्यनाही शक्यता
सूत्रधारजाई झाकला
शोधअधिकारी सच्चा
दूरवर जाईलं फेकला

रहायला हवेयं सतर्क
कुणी नजावो विकला
हित संबंध आडवे पडे
तपास जाईलं रोखला

इकडे रे खोकखोकून
बिचारा ऋग्ण थकला
औषधीचं बनली विष
कुणी जिवाला मुकला

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# प्रतिटन १५ रुपये कपात,आदेशाची लातूरला होळी:स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सदस्यांचे आंदोलन

**लातूर/प्रतिनिधी :** अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून प्रतिटन १५ रुपये कपातीचा अध्यादेशमंत्रीस्तरीय समितीने काढला आहे.या अध्यादेशाची स्वाभिमानीशेतकरी संघटनेचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांनी होळीकेली. डिगोळ देशमुख (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे झालेल्याआंदोलनात शासनाविरोधात घोषणा दिल्या. राज्य सरकारने ऊस उत्पादकशेतकऱ्यांकडून प्रतिटन १५ रुपयेकपात करण्याचा अध्यादेश काढला.त्यातील ५ रुपये शेतकऱ्यांना तर १०रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमाहोणार आहेत. या अध्यादेशाला तीव्रविरोध करीत स्वाभिमानी शेतकरीसंघटनेच्या वतीने अध्यादेशाची होळी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष धर्मराज पाटील, ॲड. विजयकुमार जाधव, माणिकरावगायकवाड, अनिल ब्याळे, बालाजीशिंदे यांच्यासह कार्यकर्ते,पदाधिकारी उपस्थित होते.

शक्तिपीठ महामार्गाच्या जमीन मोजणीला शेतकऱ्यांनी विरोध केला, राज्यभर आंदोलने झाली.तरीही शासनाकडून शेतकऱ्यांना वारंवार जमीन मोजणीची नोटीसदिली जात आहे. या नोटीसचीही शेतकऱ्यांनी होळी केली. शक्तिपीठ महामार्गासाठी कोणत्याही परिस्थितीत जमिनी देणार नाही,अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली.

# मुक्ताई प्रतिष्ठान लातूरच्यावतीने 'पुण्यश्लोक- ३००' मराठवाडा विभागस्तरीय निबंध स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाच्या दुर्मिळ योगाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष सन २०२५-२०२६ मध्ये मराठवाडा विभागातील ५ वी ते १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ऐतिहासिक कार्यकृतत्वाला उजाळा मिळावा व स्मरण व्हावे, मातृभूमीसाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या व आपल्या दातृत्वाने अजरामर झालेल्या लोकमातेच्या विचाराचा जागर व्हावा, म्हणून 'पुण्यश्लोक- ३००' या उपक्रमांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन व कार्य या विषयावर मराठवाडा विभागस्तरीय मराठी निबंध स्पर्धेचे लातूर येथील मुक्ताई प्रतिष्ठान द्वारा आयोजन करण्यात येत आहे. तरी इच्छुक स्पर्धकांनी त्यांचे निबंध लिहून फोटो कॉपी अथवा पीडीएफ स्वरुपात मुक्ताई प्रतिष्ठान च्या इमेल- muktaipratishthan21gmail.com वर अथवा व्हाट्सअप मो.नं ९८५०२६७००० वर दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत. असे आव्हान मुक्ताई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अनुसया कोरे यांनी केले आहे. निबंध वेळेत पाठवावेत उशिराने प्राप्त निबंधांचा विचार होणार नाही.

स्पर्धेचे नियम व अटी :- १) स्पर्धा नि:शुल्क तसेच लातूर जिल्ह्यातील ५ वी ते १२ वी मध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली असेल. २) निबंधासोबत स्वसाक्षांकित (स्वतःची सही) केलेले छायांकित आधार कार्ड (जन्मतारखेचा पुरावा म्हणून) पाठवावे.तसेच निबंधाच्या शेवटी आपली वैयक्तिक माहिती जसे की, विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव - वर्ग/इयत्ता - शाळेचे नाव - पिन कोडसह पत्र व्यवहाराचा पत्ता- व्हाट्सअप मोबाईल नंबर व इ-मेल इ. लिहिणे बंधनकारक आहे. ३) निबंध सुवाच्च मराठीत आणि हस्तलिखित असावा. शुद्धलेखनाचे नियम पाळले जावेत, ही अपेक्षा. निबंध ८०० ते १००० शब्दात असावा.. वाचनीय नसलेल्या निबंधांची दखल घेतली जाणार नाही. ४) निबंध लेखन इंटरनेट वरून डाऊनलोड करून घेतलेले नसावे. निबंध दिलेल्या विषयाला आणि पुण्यश्लोक देवी अहिल्याबाईंच्या कार्यकर्तृत्वाला धरून असावा. ५) निबंध पूर्णपणे स्वलिखित, स्वकल्पीत आणि नाविन्यपूर्ण असावा. शब्द मर्यादेच्या मागेपुढे जास्तीत जास्त १०० शब्दांना परवानगी असेल. ६) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. निकाला संदर्भात कोणत्याही प्रकारचे आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत. ७) प्रथम पारितोषिक- रु. ११०१ व अभिनंदन पत्र, द्वितीय पारितोषिक- रु. ७०१ व अभिनंदन पत्र, तृतीय पारितोषिक- रु. ५०१ व अभिनंदन पत्र, उत्तेजनार्थ निबंध - दोन स्पर्धक - प्रत्येकी एक अभिनंदन पत्र (लेखनशैलीचा अंतिम विचार करून उत्तेजनार्थ निबंधांच्या संख्येत वाढ होऊ शकते) ८) स्पर्धेचा निकाल यथावकाश जाहीर केला जाईल व तो व्हाट्सअप मेसेज द्वारे कळविण्यात येईल. ऐनवेळी कांही संभाव्य बदल झाल्यास आपणास तसे कळविले जाईल. ९) स्पर्धा व निकाल पारदर्शकपणे पार पडेल याची दक्षता घेतली जाईल. निबांधा संदर्भातील सर्वाधिकार निवड समितीस राहतील. विजेत्या स्पर्धकांना संपर्क साधून निकाल कळवला जाईल. व कार्यक्रमात बक्षीस वितरण केले जाईल १०) निबंध स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र व्हाट्सअप द्वारे पाठवले जाईल. मराठवाडा विभागातील जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आव्हान लातूर येथील मुक्ताई प्रतिष्ठान, च्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन
सा. बां. विद्युत विभाग, धाराशिव
ई-निविदा सूचना क्र.(१२) सन २०२५-२०२६
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, धाराशिच (दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३१) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत. सदरील निविदामध्ये ४० कामे समाविष्ठ असून या निविदे अंतर्गत संपूर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१. उपरोक्त एकत्रित कामाची निविदा किंमत रूपये १.०० कोटी पेक्षा अधीक आहेत. दहा लाखाच्या आतील किंमतीचे १८ कामे व १० लाखाच्या वरील किंमतीचे २२ कामे आहेत.
२. या निविदेसंबंधी संपूर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यातयेत आहे. तसेच या पुढील सर्व बदलाची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
https://mahatenders.gov.in
www.mahapwd.gov.in,
स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां.विद्युत विभाग, धाराशिव

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६